शुक्रवार, 05 ऑगस्ट 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 12
Title Code : MAHMAR51117

आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● FRIDAY 05 AUGUST 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-12 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

# हेराल्डमध्ये हवाला व्यवहार ?

## ईडीला मिळाले पुरावे, सोनिया-राहुल यांच्या वक्तव्यांची फेरतपासणी होणार

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : नॅशनल हेराल्ड प्रकरणाचा तपास करणाऱ्या अंमलबजावणी संचालनालयाला (ED) हवाला लिंक सापडली आहे. नॅशनल हेराल्ड आणि संबंधित संस्थांमध्ये हा हवाला व्यवहार झाल्याची माहिती आहे. ईडीच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, यंग इंडिया परिसराची झडती पूर्ण केल्यानंतर ईडी नॅशनल हेराल्ड प्रकरणात मोठी कारवाई करू शकते. याशिवाय सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या वक्तव्यांची फेरतपासणी केली जाणार आहे.**

यापूर्वी काल म्हणजेच बुधवारी ईडी अधिकाऱ्यांनी यंग इंडिया लिमिटेडचे नॅशनल हेराल्ड कार्यालय सील केले होते. ईडी आता सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या वक्तव्यांची फेरतपासणी करणार आहे. नॅशनल हेराल्ड, त्याच्या संलग्न कंपन्या आणि तिसऱ्या गटात हवाला व्यवहाराचे पुरावे सापडले असल्याचा दावा ईडीच्या सूत्रांनी केला आहे.

**ईडीला हवाला लिंक कशी मिळाली ?**

दिल्लीतील हेराल्ड बिल्डिंगमधील यंग इंडियाच्या कार्यालयाच्या तपासणीदरम्यान ईडीला काही कागदपत्रे सापडली आहेत. मुंबई आणि कोलकाता येथील हवाला ऑपरेटर्सच्या व्यवहाराचे पुरावे कागदपत्रांमध्ये सापडले आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, यंग इंडियाच्या कार्यालयाची चौकशी पूर्ण झाल्यानंतर ईडी मोठी कारवाई करेल. ही कारवाई काय असेल, हे अद्याप स्पष्ट झाले नाही.

**मंगळवारी 16 ठिकाणी छापे**

ईडीच्या पथकाने मंगळवारी पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत



दिल्ली, मुंबई आणि कोलकाता यासह नॅशनल हेराल्डच्या 16 ठिकाणी छापे टाकले होते. सोनिया आणि राहुल यांची चौकशी केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. बुधवारी ईडीने दिल्लीतील हेराल्ड बिल्डिंगमधील यंग इंडिया कंपनीचे कार्यालय सील केले. यानंतर काँग्रेस नेते राहुल गांधी आपला कर्नाटक दौरा सोडून दिल्लीला परतले.

### वक्तव्याची फेरतपासणी का?

नॅशनल हेराल्ड प्रकरणी सोनिया गांधी यांची 3 दिवसांत 12 तास चौकशी करण्यात आली. ईडीने 21 जुलैला 3 तास, 26 जुलैला 6 तास आणि 27 ऑगस्टला 3 तास चौकशी केली. यावेळी त्यांना 100 हून अधिक प्रश्न विचारण्यात आले. ईडीने जूनमध्ये पाच दिवसांत राहुल गांधींची 50 तासांपेक्षा जास्त चौकशी केली होती. चौकशीदरम्यान सोनिया आणि राहुल गांधी यांनी यंग इंडियाकडून कोणताही लाभ घेतला नसल्याचे सांगितले होते. यंग इंडियाकडून मिळालेल्या कागदपत्रांनंतर, ईडी दोघांच्याही उत्तरांनी समाधानी नाही, त्यामुळे या जबाबांची पुन्हा तपासणी केली जाईल.

## महत्त्वाची बातमी

### संजय राऊतांचा कोठडीतील मुक्काम वाढला



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिवसेना खासदार संजय राऊत यांना पत्राचाळ घोटाळा प्रकरणी सेशन्स कोर्टाने पुन्हा एकदा ईडी कोठडी सुनावली आहे. यावेळी न्यायालयाने ८ ऑगस्टपर्यंत ईडी कोठडी सुनावली. मागील सुनावणीत न्यायालयाने राऊतांना ४ ऑगस्टपर्यंत सुनावणी दिली होती. त्यानंतर आज त्यांना पुन्हा न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते. पत्राचाळ गैरव्यवहारातून संजय राऊत आणि त्यांच्या कुटुंबाला एक कोटी सहा लाख रुपये मिळाल्याचा आरोप ईडीने केला आहे. त्याबाबत माहिती घेण्यासाठी ईडीने या प्रकरणी मंगळवारी दोन ठिकाणी शोध मोहीम राबवली होती. रोख रकमेच्या व्यवहारांबाबत पुरावे गोळा करण्यासाठी ही शोध मोहीम राबवली होती. लवकरच या प्रकरणाशी संबंधित काही व्यक्तींची चौकशी करण्यात येणार आहे. 'ईडी'ने आतापर्यंत गैरव्यवहाराच्या रकमेचा माग काढला असता 'एचडीआयएल'कडून प्रवीण राऊतच्या खात्यात सुमारे ११२ कोटी रुपये हस्तांतरित करण्यात आल्याचे दिसून आले होते. ही रक्कम प्रवीण राऊत यांनी त्यांचे जवळचे सहकारी, कुटुंबातील सदस्य, त्यांच्या व्यावसायिक संस्था इत्यादींच्या विविध खात्यांमध्ये वळती केली.

## महत्त्वाची बातमी

### अमित शहांना मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार बनवणार का ?



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे (आप) राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी गुजरातमधील विधानसभा निवडणुकीसंदर्भात एका नव्या चर्चेला सुरूवात केली आहे. भारतीय जनता पक्ष (भाजप) केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना गुजरातमध्ये मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार म्हणून घोषित करणार आहे का? असा प्रश्न केजरीवाल यांनी केला आहे. एवढेच नाही, तर विद्यमान मुख्यमंत्र्यांच्या कामावर पक्ष नाराज आहे का? असा सवालही त्यांनी केला. केजरीवाल यांनी ट्विट केले आहे, की आम आदमी पक्षाचा गुजरातमध्ये वेगाने विस्तार होत आहे. यामुळे भाजपमध्ये पूर्णपणे घबराट निर्माण झाली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजप केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना गुजरातमध्ये मुख्यमंत्रीपदाचा चेहरा म्हणून घोषित करणार आहे, हे सत्य आहे का? भूपेंद्रभाई पटेल यांच्या कामावर भाजपही नाराज आहे?

# न्यायमूर्ती उदय लळीत देशाचे ४९ वे सरन्यायाधीश होणार

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** देशाचे पुढील सरन्यायाधीश कोण होणार हे स्पष्ट झाले आहे. सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांनी गुरुवारी (४ ऑगस्ट) देशाचे ४९ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती उदय लळीत यांच्या नावाची शिफारस केली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सरन्यायाधीश ए. व्ही. रमणा यांनी स्वतः गुरुवारी केंद्र सरकारला दिलेल्या आपल्या ३ ऑगस्टच्या शिफारस पत्राची प्रत न्यायमूर्ती यू. यू. लळीत यांच्याकडे सोपवली.

केंद्रीय कायदा मंत्रालयाकडून ३ ऑगस्टला सरन्यायाधीशांच्या सचिवालयाला सरन्यायाधीशपदासाठी पुढील उत्तराधिकारी निवडण्याबाबत पत्रव्यवहार झाला होता. यानंतर प्रथेप्रमाणे सरन्यायाधीश रमणा यांनी पुढील सरन्यायाधीश म्हणून यू. यू. लळीत यांच्या नावाची शिफारस केली. ए.व्ही. रमणा २६ ऑगस्टला सरन्यायाधीश पदावरून निवृत्त होत आहेत.



त्यांच्यानंतर लळीत सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतील. न्यायमूर्ती लळीत ८ नोव्हेंबर २०२२ पर्यंत सरन्यायाधीश पदावर असतील. तेही ८ नोव्हेंबरला निवृत्त होण्याआधी अशाचप्रकारे पुढील सरन्यायाधीशाच्या नावाची शिफारस करतील.

# पक्षाच्या चिन्हाबाबत निर्णय घेऊ नका; सुप्रीम कोर्ट

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** राज्यात उद्धव ठाकरे आणि शिंदे गट आमने-सामने असून सुप्रीम कोर्टाकडून आजही निर्णय येऊ न शकल्याने सत्तासंघर्ष कायम राहणार आहे. सुप्रीम कोर्टामध्ये सुनावणी सुरु झाला असता पुन्हा एकदा शिंदे गटाचे वकील हरिश साळवे यांनी १० व्या सूचीचा मुद्दा उपस्थित केला. पक्षांतरबंदी कायदा हा असंतोष विरोधी कायदा असू शकत नाही असा युक्तिवाद हरिश साळवे यांनी केला. तर दुसरीकडे उद्धव ठाकरे गटाचे वकील कपिल सिब्बल यांनी हे प्रकरण मोठ्या घटनापीठाकडे सोपवण्याची गरज नाही असे मत मांडले. दरम्यान सुप्रीम कोर्टाने निवडणूक आयोगाच्या अधिकारांमध्ये हस्तक्षेप करु शकत नाही असे सांगत त्यांना पुढील सुनावणीपर्यंत कोणताही निर्णय घेऊ नका अशी सूचना केली आहे. सोमवारी याप्रकरणी पुढील सुनावणी होणार आहे. बुधवारी झालेल्या सुनावणीत सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांनी शिंदे गटातील आमदारांच्या अपात्रतेच्या वादावर, आता हा निर्णय विधानसभाध्यक्षांनी घेतला पाहिजे, अशी आग्रही भूमिका का घेतली जात आहे, असा सवाल उपस्थित करत खडसावले होते. अपात्रतेच्या मुद्दयावरून शिंदे गटाने पहिल्यांदा न्यायालयात धाव घेतली असताना आता मात्र त्यांच्या भूमिकेत



झालेल्या बदलावर न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यामुळे आज सुनावणीत काय होणार याकडे सर्वांचे लक्ष होते.

शिंदे गटातील आमदारांची अपात्रता, विधानसभा उपाध्यक्षांविरोधातील अविश्वास प्रस्ताव, शिंदे गट आणि शिवसेनेने बदलेला विधानसभेतील गटनेता, मुख्य प्रतोद आदी मुद्दयांवर दोन्ही गटांकडून दाखल झालेल्या सहा याचिकांवर सर्वोच्च न्यायालयापुढे सुनावणी सुरू आहे. यासंदर्भात दोन्ही गटांना प्रतिज्ञापत्र सादर करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. आपण शिवसेना सोडली नसल्याचा शिंदे गटाचा दावा असून ४० आमदारांना १५ आमदारांचा गट अपात्र ठरवू शकत नाही, अशी भूमिका मुख्यमंत्री शिंदे यांनी सर्वोच्च न्यायालयात घेतली आहे. राज्यघटनेतील दहाव्या परिशिष्टानुसार शिंदे गटातील आमदारांनी अन्य पक्षात विलीनीकरण न केल्याने त्यांना अपात्र ठरवावे, अशी शिवसेनेची मागणी आहे.

# सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळणार !

## खाद्यतेल आणखी स्वस्त होण्याची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सणासुदीच्या काळात खाद्यतेलाच्या किमती कमी होऊ शकतात. तेलाच्या किमती कमी करण्यासाठी सरकारकडून जोरदार प्रयत्न सुरू आहेत. खाद्यतेलाचा आढावा घेण्यासाठी अन्न सचिवांनी गुरुवारी खाद्यतेल कंपन्यांसोबत बैठक बोलावली आहे. सरकार कंपन्यांना 10 रुपयांपर्यंत किंमत कमी करण्यास सांगू शकते. याचा फायदा सर्वसामान्यांना होणार आहे. कारण अनेक महिन्यांपासून तेलाच्या किमती स्थिर आहेत. मात्र, काही दिवसांपासून दरात घट दिसून येत आहे. पण, सणांवर टंचाईचा परिणाम आणखी काही खास दिसून येईल.

खाद्यतेलाचे दर कमी करण्यात सरकारला यश आल्यास सणासुदीच्या काळात सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्यासाठी खाद्यतेलाच्या किमतींचा आढावा सरकार घेणार आहे. संसदेतही हा मुद्दा उपस्थित झाला असून महागाईवर सरकारला उत्तर द्यावे लागले आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात विरोधक सातत्याने हा मुद्दा उपस्थित करत असून, महागाईच्या मुद्द्यावरून अनेक दिवसांपासून संसदेचे कामकाज सुद्धा विस्कळीत झाले आहे. गुरुवारी अन्न सचिवांशी झालेल्या बैठकीनंतर खाद्यतेल सुमारे 8 ते 10 रुपयांनी स्वस्त होऊ शकते, असे म्हटले जात आहे.

तेलाच्या किमती कमी करण्यासाठी आधीपासूनच तयारी सुरू आहे. सरकारने आधीच कंपन्यांना किमती कमी करण्यास सांगितले आहे. त्यामुळे 200 रुपये लिटरने विकले जाणारे मोहरीचे तेल 160-170 रुपयांवर पोहोचल्याचे दिसून आले. गेल्या महिन्यात कंपन्यांनी किमतीत 20 ते 25 रुपयांनी कपात केली आहे. त्याचा परिणाम किरकोळ बाजारातही दिसून येत आहे. यासोबतच, आंतरराष्ट्रीय बाजारात खाद्यतेलाच्या किमतीही घसरल्या असून, त्याचा फायदा हळूहळू देशांतर्गत




बाजारात होताना दिसून येत आहे. परदेशी बाजारपेठेत खाद्यतेल सर्वोच्च पातळीपासून 50 टक्क्यांनी स्वस्त झाले आहे.

**भारतात खाद्यतेल महाग का?**

दरम्यान, भारतात आवश्यक तेलाचा साठा पुरत नाही. आपला बहुतांश तेलाचा पुरवठा परदेशातून आयात केला जातो. परदेशात तेल महाग झाले की, त्याचा परिणाम देशांतर्गत बाजारातही दिसून येतो. गेल्या वर्षभरात ही परिस्थिती निर्माण झाली आहे. मलेशियामधून पामतेल आयात केले जाते आणि तेथे किंमत वाढली की भारतातही वाढते. सध्या परदेशातील बाजारात भाव कमी झाले आहेत, त्यामुळे भारतातही दिलासा आहे.

भारत आपल्या गरजेच्या 60 टक्के तेल आयात करतो आणि यामुळेच भारताच्या किंमती परदेशी किमतींवर अवलंबून असतात. दुसरीकडे, तेल कंपन्यांनी खाद्यतेलावरील स्टॉक लिमिट हटवण्याची मागणी केली आहे. यावर सरकारने निर्णय घ्यायचा आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# जो हुकूम मेरे आका...

आधुनिक केसरी

अल्लाउद्दीन आणि जादूचा दिवा मला आठवण्याचं एक कारण झालं. माझं जीमेल ओपन केलं की मला वरच्या चौकटीत ठळक लाल अक्षरात एक मेसेज दिसायचा. तो म्हणजे तुमचे स्टोरेज संपले असल्याचा. मग दोन पर्याय यायचे. पहिला पर्याय म्हणजे MANAGE STORAGE आणि दुसरा पर्याय BUY STORAGE. माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीला गोंधळात टाकणारी ही स्थिती. कारण एक तर आम्ही प्रयत्नांती हे सगळं वापरायला शिकलो. त्यामुळे चुकत जायचं आणि शिकत जायचं अशी परिस्थिती. मग एक दोन मित्रांना विचारलं. ते म्हणाले, ' स्टोरेज विकत वगैरे घेऊ नका. तुम्हाला न लागणारे फोटो, इमेल्स, व्हिडीओ वगैरे डिलीट करा. ' मग आम्ही त्यांच्या सल्ल्यानुसार पहिला पर्याय निवडला. तो म्हणजे MANAGE STORAGE चा. नको असलेल्या इमेजेस, व्हिडीओ, इमेल्स धडाधड डिलीट मारल्या. बरेच एम बी, जीबी वगैरे काय असेल तो डेटा डिलीट झाला. पण ती सूचना काही जाईना. त्या जिनचे समाधान होईना. तो आपला समोर सारखा उभा राहायचा. मी डिलीट कर म्हटलं की जो हुकूम मेरे आका म्हणून लगेच डिलीट करायचा. बरंच काही डिलीट करून झालं. अगदी आठवण म्हणून जपून ठेवाव्यात अशा इमेजेस, काही खास क्षणांचे व्हिडीओ सगळं सगळं डिलीट करून झालं. पुन्हा हा आपला उभाच ! कितीही जेवला तरी ज्याचं समाधान होत नाही असा बकासुर आणि हा सतत हाताची घडी घालून समोर उभा असणारा ' जो हुकूम मेरे आका ' यात काय फरक आहे ? त्यांचं समाधान होतच नाही. भीमानं बकासुराचा अंत करणं आणि या जीनला युक्तिप्रयुक्तीनं पुन्हा बाटलीत बंद करणं एवढाच उपाय उरतो मग ! तसं मी त्या जीनला बाटलीत बंदिस्त केलं. तो बाटलीतून गयावया करताना मला दिसत होता पण मी ठरवलं आता याच्याकडे अजिबात लक्ष द्यायचं नाही.

ती सूचना रोज यायची. मला जिनची आठवण करून द्यायची. पण आता मी ठरवलं होतं की त्याकडे लक्षच द्यायचं नाही. आणि काय आश्चर्य ! बहुधा तो जीन कंटाळला असावा. एक दिवस ती सूचना आश्चर्यकारकरित्या गायब झाली. पण ही घटना मला विचारात टाकून गेली. माझ्या डोळ्यासमोर सगळं काही गिळंकृत करणाऱ्या जिनची वेगवेगळी रूपं नाचायला लागली. जिनचं रूप घेऊन व्हाट्सअप उभं राहिलं. मला म्हणालं, ' मेरे आका, मैं बहुत कुछ कर सकता हूँ. जरा आजमाके तो देखिये. ' मी म्हटलं सांग बाबा काय काय करतोस तू ? मला म्हणाला, ' तुम्हारी दुनिया ही बदल दूंगा. तरह तरह की प्रतिमायें, गाने, व्हिडीओज आपके सामने हाजीर करुंगा. अगर कुछ पढना चाहोगे तो बहुत कुछ पढनेको मिलेगा. **(क्रमशः)**



# आनंदी पहाट

## आनंददायी व्यक्तिमत्त्व

आधुनिक केसरी

एखाद्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास आणि वाढ होण्याची प्रक्रिया ही बालपणातच सुरु होत असते. व्यक्तिमत्व विकास एखाद्या व्यक्तीला आत्मविश्वास आणि उच्च आत्मसन्मान मिळविण्यास मदत करतो. व्यक्तिमत्व विकासाचा परिणाम म्हणून व्यक्ती सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतात. सशक्त व्यक्तिमत्त्व हे विचारशील आणि सुज्ञ असण्याचा परिणाम असतो. विचारशील असणे आणि सुज्ञ असणे ह्या दोघांमध्ये खूप फरक आहे. तुमचा मेंदू चांगल्यासाठी वापरण्यात तुम्ही वेळ आणि मेहनत लावल्यामुळे तुम्ही विचारशील बनता. जेव्हा लोक त्यांना काहीच माहीत नसलेल्या गोष्टींबद्दल झटपट निर्णय घेतात तेव्हा तुम्हाला त्याचा तिरस्कार वाटतो. पण तोच निर्णय विचारपूर्वक घेतला म्हणजे तुम्ही खऱ्या अर्थाने सुज्ञ होता.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

एक आनंददायी व्यक्तिमत्व असे असते कि जे इतरांना मदत करण्यात आणि त्यांना मूल्यवान करण्यावर विश्वास ठेवते. आनंददायी व्यक्तिमत्त्व घडवण्यात तत्त्वे खूप महत्त्वाची भूमिका बजावतात. सकारात्मक व्यक्तिमत्व वैशिष्ट्ये त्यामुळेच प्राप्त होणे शक्य होऊ शकते. जे लोक दयाळूपणा आणि प्रामाणिकपणा यासारखे गुण प्रदर्शित करतात, ते अधिक नकारात्मक व्यक्तिमत्त्व असलेल्या लोकांपेक्षा अधिक आकर्षक असल्याचे दिसून येते. व्यक्तिमत्व विकासाचा सर्वात सक्रिय कालावधी साधारणपणे २० वर्षे ते ४० वर्षे वयोगटातील असतो. जरी व्यक्तिमत्व वयानुसार आणि सामान्यतः ५० वर्षांच्या जवळ वय आणि वजन जरी सातत्याने वाढत असले तरी, व्यक्तिमत्व कधीही पूर्ण स्थिरतेच्या कालावधीपर्यंत पोहोचत नाही. मुलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी पालकत्वाचे प्रमुख चार प्रकार दिसून येतात. आज बाल मानसशास्त्रात वापरल्या जाणाऱ्या चार मुख्य पालक शैली म्हणजे परवानगी देणाऱ्या, अधिकृत, दुर्लक्षित आणि हुकूमशाही ह्या होत.



आधुनिक केसरी

### भार त्याचा वाहे | पांडुरंग ||

उभा जन्म सारा | दुःखाने ग्रासला ||
चिंतेने व्यापला | क्षण सारा ||१||

सुख पळभर | मिळेना जीवाला ||
अस्थिर | मनाला | सुख कैसे ? ||२||

आनंदाचे गांव | असता अंतरी ||
उगा अधांतरी | शोधी वेड्या ||३||

सुखाचे साधन | सांगी संतजन ||
प्रसन्न ते मन | सुखदायी ||४||

मनी शुद्ध भाव | आचार सत्कर्म ||
हेची खरे वर्म | आनंदाचे ||५||

सुख दुःख दोन्ही | समदृष्टी पाहे ||
भार त्याचा वाहे | पांडुरंग ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी


**पृथिव्यां पुत्रास्ते जननि बहवः सन्ति सरलाः**
**परं तेषां मध्ये विरलतरलोऽहं तव सुतः।**
**मदीयोऽयं त्यागः समुचितमिदं नो तव शिवे**
**कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ॥३॥**

आई ! या पृथ्वीवर तुझी सरळ स्वभावाची पुष्कळ मुले आहेत पण त्यामध्ये मी तुझा खूप चंचल मुलगा आहे. माझ्यासारखा चंचल माणूस खूप दुर्मिळ असेल, हे शिवे ! तू मला सोडून देणे योग्य नाही, कारण मुलगा कुपुत्र होऊ शकतो, पण माता ही कुमाता होऊ शकत नाही. || ३ ||



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# ।। दासबोध स्तवन ।।



## मायाब्रह्मनिरूपण

आधुनिक केसरी

समर्थाच्या तत्वनिष्ठ स्वभाव गुणधर्मानुसार हा समास अतिशय महत्त्वाचा समजला जातो. परमात्म वस्तुचें सहजसुंदर वर्णन ,समजेल अशा सोप्यात सोप्या शब्दांत सांगितले आहे. फक्त या विशाल वाङ:मयाकडे बघण्याचा तुमचा द्रुष्टीकोन हवा. परमात्म वस्तूचें इतक्या विविध अंगानीकेलेले साधे सोपे वर्णन मराठी भाषेत तुम्हाला। कुठेही सापडणार नाही. त्यामध्ये समर्थानी उपनिषदामधील सार अक्षरशः ओतले आहे.

विश्वाचे मूळतत्व एकच आत्मा आहे . यात अनेकपणा नाही.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

"नेहनानस्ति किंचन,'"
याठिकाणी अनेकपणाला थारा नाही.
मगं प्रश्न असा पडतो की 'अनेक पणाने भारलेले जग कसे निर्माण झाले ?
समर्थ त्याचे उत्तर पूढील प्रमाणे देतात.
आत्म्यावांचून इतर वस्तू चं नाही म्हणून आत्माचं अनेकपणाने दिसतो."यामध्ये द्वैत व अद्वैत दोन्ही सारखे च सत्य दिसतात.
पण एकपण व अनेक पणा परस्पर विरूद्ध असल्याने दोन्ही एकाच वस्तूच्या बाबतीत सारखे सत्य असू शकत नाही. अद्वैत सत्य आहे असा आत्मज्ञानी पुरूषाचा प्रत्यक्ष अनुभव आहे. तोतर आपण प्रमाण मानला पाहिजे. मगं प्रश्न असा पडतो की"आत्मा एकच एक आहे संपूर्ण सत्य आहे.सर्व व्यापी ,अनंत,व अविनाश आहे. हेजर खरे आहे तर त्या आत्म्यामधें अनेकपणाने भरलेलं,सतत पालटणारे अदवंत,अपूर्ण द्वेतमय जीवन झालेच कसे ?खरे लोकांना हा प्रश्नच येत नाही. आत्मज्ञान नसणारी माणसं या विचाराने गोंधळून गेलेले  दिसतात.

"मायाब्रम्ह निरूपण" हे काही दहा ओळीत लिहून संपणार निरूपण नाही. मी तर म्हणेन की आता जेवढं वाचन करता करता ते अधिकाधिक मी त्यात गुंततचाले आहे. थोडक्यात सांगायचे तर जसजसं लिहिते आहे. तसतसे अजूनही काही बाकी आहे असं वाटतं आहे. यालाचं तर "भगवत् भक्तिची भुक म्हणतात का ?" असो तर आपण पुढचा समासाचा अभ्यास करूया.

शुदध् निर्गुण व निर्मळ परब्रम्हामध्ये अक्षरशः अनंत शक्ति वास करतात. त्यापैकी द्रुष्य किंवा नामरूपे किंवा आकार निर्माण करणारी एक अति विलक्षण शक्ति आहे. पूर्ण निराकार आणि स्वतंत्र परमात्मवस्तूला अनंत आकार देणारी आणि द्रुश्याच्या कक्षेत येणारी अशी शक्ति प्रथम आत्मस्वरूपावर लक्ष देत नाही. ती ते आत्मस्वरूप बाजूला ठेवते. त्या शक्तिचे नाव माया आणि झाकणाचे नाव आहे अज्ञात किंवा अविद्या होय.अज्ञान, भ्रम, अध्यास,देहबुद्धी ही सगळी मायेची च प्रजा आहे. आत्मज्ञानी पुरूषाला परमात्म वस्तु जशी आहे तशीच अनुभवायला मिळते.

**(क्रमशः)**

# नाथ मंदिरातील विठ्ठल मूर्ती वेगळी का आहे ?

आधुनिक केसरी

पैठण गावात जे नाथांचं मंदिर आहे, त्यांच्या देवघरात सर्वात वर तुळशीचं माळ घातलेली पांडुरंगाची मूर्ती आहे ती सदैव फुल वस्त्र अलंकाराने झाकलेली असते त्यामुळे मूर्तीचे फक्त मुखकमल दर्शन होत असते
वास्तविक या मूर्तीचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. आपण सहसा पांडुरंगाची मूर्ती दोन्ही हात कमरेवर ठेवून उभा असलेला पांडुरंग पाहतो पण या मूर्तीत पांडुरंगाचा डावा हात कमरेवर आहे तर उजवा हात कमरेच्या खाली आहे पण समोरच्या बाजूला उघडणारा तळवा किंवा तळहात दिसतो. म्हणून त्याला " विजयी पांडुरंग" असे म्हणतात.
या विजयी पांडुरंग कसा याची एक सुंदर आख्यायिका आहे, हा भगवंत नाथांना प्रासादिक रुपाने मिळालेला आहे ही मूर्ती दिडफुट उंचीची आणि अडीच किलो वजनाची पंचधातूंपासून बनवलेली मूर्ती आहे. कर्नाटकातील राजा रामदेवराय हा पंढरपूरच्या पांडुरंगाचा उपासक होता त्यामुळं यान मंदिर



बांधलं आणि सोनाराकरवी पंचधातूंची मूर्ती बनवून घेतली आणि त्याची प्राणप्रतिष्ठा करणार तोच पांडुरंग दृष्टांत देऊन त्यांना म्हणाला  "माझी ही मूर्ती तू इथे स्थापलीस तर मी इथे राहणार नाही आणि माझ्या इच्छेविरुद्ध तू तसं केलंस तर तुझा निर्वंश होईल "मग राजाने विचारले की या मूर्तीचे काय करू तेव्हा पांडुरंग म्हणाला की पैठणच्या नाथ महाराजांना नेऊन दे...
त्यानंतर राजाने ती मूर्ती वाजत गाजत पैठणला आणली तेव्हा नाथ महाराज मंदिरात असलेल्या खांबाला टेकून प्रवचन सांगत होते ते ज्या खांबाला टेकून पुराण सांगायचे त्या खांबाला पुराण खांब असे म्हणतात. राजा रामदेवराय नाथांचे प्रवचन संपेपर्यंत थांबले आणि त्यांनी ही मूर्ती तुमच्याकडे कशी किंवा का आणली हे सर्व नाथांना सांगितले आणि त्यामुळे भगवंतांना तुमच्याकडे ठेवून घ्या असे  सांगितले.
त्यावर नाथांनी मूर्तीला नमस्कार केला आणि म्हणाले की तू राजाच्या घरी राहणारा आहेस माझ्याकडे तुझी रहायची इच्छा आहे पण राजासारखे पंचपक्वान्न माझ्याकडे तुला मिळणार नाहीत, तेव्हा या भगवंताच्या पायाखालच्या विटेवर अक्षरं उमटली "दास जेवू घाला न.. घाला" म्हणजे हे नाथ महाराज मी तुझ्याकडे दास म्हणून आलोय तू जेवायला दे अथवा न दे मी तुझ्याजवळ राहणार आहे.
हेही या मूर्तीच एक वैशिष्ट्य सांगता येते की विटेवर अजूनही ही उमटलेली अक्षरे आहेत.
प्रत्यक्ष भगवंत घरी आले म्हणल्यावर पूर्वी पाहुणचार म्हणून कोणी बाहेरून आले की गुळ पाणी दिले जायचे पण प्रत्यक्ष भगवंत आलेत म्हणल्यावर त्यांनी आपल्या पत्नी ला आवाज दिला त्यांचे नाव गिरीजाबाई होते त्यांचा पाहुणचार म्हणून बाईंनी चांदीच्या वाटीत लोणी आणि खडीसाखर आणलं नि नाथांच्या समोर धरलं हे लोणी घेण्यासाठी म्हणून भगवंतांनी आपला उजवा हात कमरेवरचा काढून पुढे केला नि लोणी चाटले नंतर तो हात लोणचट म्हणजेच थोडा लोणी लागलेला असल्याने परत कमरेवर ठेवताना हात व्यवस्थित कमरेवर ठेवला नाही म्हणून त्या मूर्तीचा हात असा आहे आणि या मूर्तीच दुसरं वैशिष्ट्य असं आहे की आजही प्रत्येक एकादशीला अभिषेकासाठी मूर्ती खाली घेतली जाते तेव्हा संपूर्ण अभिषेकानंतर मूर्तीला पिढीसाखरेने स्वच्छ पुसलं जातं तेव्हा हाताला ही पुसलं जातं तेव्हा त्या हातावरून हात फिरवला तर आजही लोण्याचा चिकटपणा जाणवतो.
याच भगवंतांनी नाथांच्या घरी कावडी ने पाणी वाहीले. मूर्तीच्या खांद्यावर पाणी वाहिल्याचे घट्टे आजही दिसतातअशा तीन वैशिष्ठ्याने नटलेली ही विजयी पांडुरंगाची मूर्ती आहे...!

# राष्ट्रीय महामार्ग होऊनही वाहनधारकांच्या मणक्यांची समस्या कायमच



आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**उस्मानाबाद :** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 52 सोलापूर धुळे या चौपदरीकरण महामार्गाला अवघ्या काही वर्षांमध्येच खड्ड्याचे स्वरूप आले आहे. तर संततदार पावसामुळे अनेक ठिकाणी राष्ट्रीय महामार्ग खचलेला आहे. तरीही या खड्ड्याला काल डोळा करत दोन वसुली बाबत अधिक क्रियाशील दिसून येत आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यातील येडशी व पारगाव या ठिकाणी टोल नाके आहेत. मात्र याच दोन टोल नाक्यामधील अंतरामध्ये रस्त्याची अक्षरशा चाळण झालेली आहे. अनेक ठिकाणी गुडघ्या एवढे खोल खड्डे पडल्याचे चित्र आहे. खड्ड्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत आहे. प्रवाशांच्या जीवनात धोका निर्माण झाला आहे.

अनेक ठिकाणी पावसाच्या पाण्याने रस्ताच खचल्याने पावसाचे पाणी त्यात साचल्यामुळे पाण्याची टक्के तयार झाले आहेत. वाहनधारकांना त्याचा अंदाज येत नसल्याने अनेक मोठे मोठे कंटेनर पलटी होण्याची उदाहरणे ही समोर येत आहेत. वाहन चालकांना धोकादायक स्थितीतून नेमका कोणता खड्डा चुकवायचा यासाठी खूप मोठी कसरत करावी लागत आहे. याच खड्ड्यांमुळे कोणाला कायमचे अपंगत्व येत आहे. तर कोणाला आपला जीव गमवावा लागत आहे.

टोल वसुली म्हणजे टाळू वरील लोणी खाणारे अनुभव वाहनधारकांना येत आहे. कारण खड्ड्यांमुळे एखाद्या गाडीचा छोटा अपघात जरी झाला तरी त्या गाडीला पुढे महामार्गवरून जाताना टोल भरून जावा लागेल आहे. केंद्र शासनाकडून विकासाचे एक पाऊल पुढे टाकत असतानाच त्याच पावलावर पाऊल ठेवत चालणाऱ्या नागरिकांचे दुसरे पाऊल मात्र खड्ड्यातच पडत आहे. त्यामुळे अनेक चाकरमान्यांना मणक्याच्या आजाराचे गंभीर प्रश्न उद्‌भवत आहेत. तर महामार्गच्या लगत असणाऱ्या पेट्रोल पंप धारक, धाबे मालक, बार हॉटेल मालक या लोकांनी आपल्या व्यवसायाच्या सोयीनुसार चक्क रस्ता दुभाजकच नष्ट केला आहे, त्यामुळेही रात्री अपरात्री अनेकांना आपले जीवन लागतात.



# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत शिवसेनाच बाजी मारणार : आ.दानवे

## आपला भगवा आपली शिवसेना मोहिम रविवारपासून सुरु

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत गेल्या वेळेपेक्षा शिवसेना दोन जागा जास्तच मिळवणार असा विश्वास जिल्हाप्रमुख तसेच आ.अंबादास दानवे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

आदित्य ठाकरे यांच्या संकल्पनेतून तयार झालेली आपला भगवा आपली शिवसेना ही मोहिम चंद्रकांत खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवली जाणार आहे. यामधे संपर्क प्रमुख विनोद घोसाळकर, आ.मनिषा कायंदे, आ.उदयसिंग राजपूत हे उपतालुका, उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख स्थानिक स्वराज्य संस्थांचे माजी सदस्य यांना मोहिम राबवण्यासाठी मार्गदर्शन करणार आहेत. येत्या ७ ते २० ऑगस्ट दरम्यान शहरात राबवली जाणार आहे. कन्नड, सोयगाव, गंगापूर, वैजापूर, खुलताबाद, शहरातील मध्य, पश्चिम विभाग या ठिकाणी मोहिम राबवली जाणार असल्याचे आ.दानवे म्हणाले.

एका प्रश्नाच्या उत्तरात ते म्हणाले की, एका माजी महापौराला



दबाव टाकून शिंदे गटाने तिकडे नेले होते. पण ते पुन्हा परतले. तसेच शिवसेनेची प्रत्यक्ष फील्डवर काम करणारी फौज तेवढीच सशक्त आहे. त्यामुळे ४० आमदार गेल्याची चिंता शिवसेना करत नाही. आ.अब्दुल सत्तार डरपोक आमदार आहे. बडबड केल्याशिवाय काहीच करत नसल्याचा आरोप आ.दानवे यांनी पत्रकार परिषदेत केला. त्यामुळे सत्तारला फार सिरीयसली घेऊ नये ते व्यावसायिक राजकारण करणारे आमदार आहेत. एखादी कंपनी चालवल्यासारखे ते वावरत असतात, असा सल्ला आ.दानवे यांनी माध्यमांसमोर दिला. या पत्रकार परिषदेला जयवंत ओक, आनंद तांदुळवाडीकर, जेजूरकर, गोपाल कुलकर्णी यांची उपस्थिती होती.



# औरंगाबादेतील पगारिया शोरुम फोडले

## १५ लाखांच्यावर रोकड लंपास; दोन रिकाम्या तिजोऱ्या फेकल्या तीसगाव शिवारात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अदालतरोड वरील पगारिया ऑटो चे शोरुम बुधवारी रात्री २च्या सुमारास फोडून त्यातील तिजोऱ्या उचलून नेत १५ लाख रु. च्या वर रोकड लंपास केली व रिकाम्या तिजोऱ्या तीसगाव शिवारात फेकल्या या प्रकरणी क्रांतीचौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

आज सकाळी नेहमीप्रमाणे शोरुम उघडण्यास आलेल्या नोकराला शोरुम चे शटर वाकवल्याचे दिसले. त्याने ही माहिती क्रांतीचौक पोलिसांना दिली. त्यानंतर घटनास्थळी पोलिस उपनिरीक्षक विकास खटके, पोलिस कर्मचारी इरफान व अन्य सहकारी घटनास्थळी दाखल झाले. तसेच गुन्हेशाखेचे पोलिस निरीक्षक अविनाश आघाव, एपीआय मनोज शिंदे, पीएसआय कल्याण शेळके यांनीही धाव घेतली. सी.सी.टिव्ही फुटेज तपासले असता त्यामधे ५ जण आल्याचे दिसत होते. पण जाताना तिजोऱ्या कशा नेल्या याबाबत अद्याप कोणतेही फुटेज मिळाले नसल्याचे पोलिसांनी सांगितले.

तीसगाव शिवारात शिरताना उड्डाण पुलाजवळच त्या रिकाम्या तिजोऱ्या पोलिसांना सापडल्या. शोरुमच्या बाहेर दोन सुरक्षा रक्षक असताना ही घटना कशी घडली, याचा तपास सुरु असल्याचे एपीआय मनोज शिंदे यांनी सांगितले.



# आपेगाव ग्रामपंचायत निवडणुकीत शांततेत ९०.६४ टक्के मतदान

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील आपेगाव येथील ग्रामपंचायतीच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये शांततेत पण चुरशीने ९०.६४ % टक्के मतदान झाले. या निवडणुकीमध्ये आजपर्यंत सत्ता अबाधित ठेवणाऱ्या ज्ञानराज ग्रामविकास पँनलला विठु माऊली ग्रामविकास पँनलचे आव्हान होते. यावेळी ज्ञानराज ग्रामविकास पँनल सत्ता अबाधित ठेवणार की परिवर्तन होणार हे उद्याच शुक्रवारी दि. ५ रोजीच्या मतमोजणीनंतर ठरणार आहे.

आपेगाव पुरुष ८९८ व महिला ८४१ असे एकूण १७४२ मतदार आहेत. त्यापैकी १५७९, ९०.६४ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. ही मतदान प्रक्रिया पूर्णपणे शांततेत चुरशीने पार पडली. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. प्रत्येक उमेदवार व कार्यकर्ते आपले मताधिक्य वाढावे यासाठी धडपड करताना दिसत होते. अपंग व वृद्ध मतदारांसाठी व्हीलचेअरची सोय करण्यात आली होती. येथील मतदान केंद्रावर पैठण पोलिसांच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तहसीलदार दत्तात्रय निलावाड, पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी भेट देऊन बंदोबस्ताचा आढावा घेतला. या निवडणुकीमध्ये केंद्र अध्यक्ष म्हणून उमाकांत धतींगे, आनिल चाबुकस्वार, ई.वाय. राशिनकर यांनी काम पाहिले तसेच पैठण पोलिसाच्या वतीने पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक बुरकुल, बीट जमादार शेख, धांडे, मसलकर, जिवडे, शिंदे मँडम, पोलिस पाटील संजय गडकर, कोतवाल सोमनाथ कोल्हे यांनी काम पाहिले.



# धोकादायक मद्यप्राशन

आधुनिक केसरी

धुम्रपान, मद्यपान तसेच ड्रग्स सेवन शररीरासाठी हानिकारक असल्याचे म्हटले जाते. या व्यवसनांच्या आहारी जाऊ नये, असा सल्ला डॉक्टरांकडून कायम दिला जातो. मात्र असे असतानाही जगात कोट्यवधी लोक मद्यापान, धुम्रपान तसेच ड्रग्सचे सेवन करताना दिसतात. ड्रग्सजेवन ही एक प्रतिष्ठेची बाब असल्याचा भ्रम काही तरुणांच्या मनात असतो. मद्यापेक्षा ड्रग्ससेवन जास्त अपायकारक असते असा दावा करत मद्यसेवनाचे काहीजण समर्थन करतात. मात्र ड्रग्सपेक्षा मद्यप्राशनाची सवय ही जास्त हानिकारक आहे. मद्य हे जगातील सर्वात हानिकारक द्रव्य आहे, असा दावा संशोधनातून करण्यात आला आहे. ब्रिटनच्या इंडिपेंडन्ट सायंटिफिक कमिटी ऑन ड्रग्ज आणि ब्रिटीश सरकारचे माजी मुख्य औषध सल्लागार डेव्हिड नट यांच्यासह शास्त्रज्ञांच्या एका गटाने २०१० साली एकूण २० मादक पदार्थावर अभ्यास केला होता. या पदार्थांचे सेवन केल्यानंतर शरीरावर काय परिणाम होतात, हे या अभ्यासात तपासण्यात आले. अभ्यासानंतर मद्य म्हणजेच दारू ही सर्वात हानिकारक असल्याचे या अभ्यास गटाने सांगितले होते. दारूनंतर हेरॉईन आणि क्रॅक कोकेन दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर हानिकारक असल्याचेही या अभ्यासात सांगण्यात आले होते. बंगळुरू येथील फोर्टिस हॉस्पिटलमधील मानसोपचारतज्ज्ञ डॉ. व्यंकटेश बाबू यांनी मद्यप्राशनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांवर अधिक माहिती दिली आहे. अल्कोहोल म्हणजेच दारूला शरीरावर सर्वाधिक परिणाम करणारे द्रव्य म्हणून पाहिले जाऊ शकते. कारण अल्कोहोलमुळे हृदय, मेंदूशी संबंधित आजार होऊ शकतात. तसेच दारू मधूमेहासही कारणीभूत ठरू शकते. दारूचे व्यापक, दीर्घकालीन सेवन केल्यामुळे शरीरावर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात, असे मत डॉ. व्यंकटेश बाबू यांनी नोंदवले आहे. नॅशनल हेल्थ पोर्टल ऑफ इंडिया नुसार भारतात मद्यपान करणाऱ्यांचे प्रमाण बरेच आहे. या पोर्टलवर जारी करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागात मद्यप्राशन करणाऱ्यांचे प्रमाण २३ ते ७४ टक्क्यांपर्यंत आहे. तस हे प्रमाण महिलांमध्ये २४ ते ४८ टक्क्यांपर्यंत आहे. जगातिक पातळीवर विचार करायचे झाल्यास ३ दसलक्ष मृत्यू हे मद्याच्या हानिकारक वापरामुळे होतात. तर ०.५ दसलक्ष मृत्यू हे ड्रग्समुळे होतात. मद्यामुळे यकृताचे आजार होण्याची शक्यता असते. मद्यामुळे यकृतामधील चरबीचे प्रमाण वाढते. तसेच मायटोकॉन्ड्रियाला हानी पोहोचते, असे द्वारका येथील आकाश हेल्थकेअरमधील गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी हेपॅटोलॉजी आणि थेरप्यूटिक एंडोस्कोपी विभागाच्या प्रमुख डॉ. शरद मल्होत्रा यांनी सांगितले. तर ड्रग्सच्या सेवनाबाबत बोलायचे झाल्यास कोकेन, हिरॉईन यासारखे ड्रग्ज थेट रक्तप्रवाहात मिसळतात. ड्रग्समुळे यकृताला इजा होते, हेपेटायटीस बी, सी आणि एचआयव्ही सारख्या रोगांनादेखील निमंत्रण दिले जाते. डॉ. बन्सल यांनी ड्रग्स आणि मद्यसेवनामुळे मानसिक आरोग्यावर कसे परिणाम होतात, यावर प्रकाश टाकला आहे. दारू आणि ड्रग्सच्या अतिसेवनामुळे मेंदू तसेच न्यूरोलॉजिकल मार्गावर परिणाम होतो. यामुळे स्मरणशक्ती कमी होणे, भ्रम निर्माण होणे, स्मृतीभंश, वागण्या-बोलण्यात बदल होणे, या समस्या उद्भवू शकतात.

# हवं शुद्ध पाणी,पण नको नासाडी



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**निरोगी राहण्यासाठी व्यक्तीने दिवसातून किमान दोन लिटर पाणी प्यावे. मात्र, प्रदूषित पाणी प्यायल्यास त्याचा थेट परिणाम आरोग्यावर होतो. कर्करोग, किडनीचे आजार होऊ शकतात. त्यामुळे पाणी शुद्ध करूनच प्यावे लागणार आहे. आज संपूर्ण जगात पेयजल संकटाचा विषय खूपच गहन बनला आहे. कुठे तो भूजल स्खलन रूपाने तर कुठे नद्यांच्या प्रदूषण रूपाने पाहायला मिळतो. सुकलेले तलाव आणि आकसलेली सरोवरे पाहायला मिळतात. तर जलस्तरही घटत चालला आहे.**

रामरहीम यांनी पाण्याचं महत्त्व अधोरेखित करताना सांगितलं होतं की, रहिमन पानी राखिए, बीन पानी सब सून,पानी गए न ऊबरे , मोती मानुष चून। अर्थात मोती, मानुष म्हणजे मनुष्य आणि चुन्याची चमक तोपर्यंत आहे,जोपर्यंत त्यात पाणी असते. जर या तिन्हींतून पाणी बाजूला केले तर ते तेजहीन, कांतिहीन होऊन जातील. परंतु या ओळी मनुष्य आणि पाणी यांच्याबाबतीत अधिक चपखल बसतात. कवीने याची उद्घोषणा शेकडो वर्षांपूर्वी केली होती. त्यावेळी निसर्ग फारच शानदार होता. पर्यावरणात आजच्या सारखे प्रदूषण घुसले नव्हते. लोकांचे घनत्वही अत्यंत कमी होते. पण माणसाचा स्वभाव असा की, जोपर्यंत संकट चालून येत नाही, तोपर्यंत तो काही शिकण्याच्या भानगडीत पडत नाही. आज देशातील 80 टक्के लोक प्रदूषित पाणी पितात. हा माहिती धक्कादायकच नाही तर भीतीदायकही आहे.



देशातील पिण्याच्या पाण्याचा दर्जा खालावत असल्याची कबुली केंद्र सरकारने संसदेत दिली आहे. पिण्याच्या पाण्याबाबत सरकारने राज्यसभेत दिलेल्या आकडेवारीनुसार देशातील सर्व राज्यांतील बहुतांश जिल्ह्यांमध्ये भूगर्भातील पाण्यामध्ये विशिष्ट प्रमाणापेक्षा अधिक विषारी धातू आढळून आले आहेत. महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील काही ठिकाणचे पाणी सर्वाधिक प्रदूषित असल्याची बाब समोर आली आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पाण्याचे आणि भूजलाचे नमूने तपासून पाणी प्रदूषणाचा एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. महाराष्ट्रात तापी नदी सर्वाधिक प्रदूषित आहे. अहवालानुसार ठाणे जिल्ह्यातील काही ठिकाणचे पाणी सर्वाधिक प्रदूषित असल्याचे स्पष्ट झाले आहे. तर, कोल्हापूर, नागपूर, चंद्रपूर, पुणे, नाशिकमधील अनेक ठिकाणचे पाणी पिण्यास अयोग्य असल्याचे अहवालात म्हटले आहे. राज्यात तापी नदीनंतर विदर्भात वर्धा, वैनगंगा, प्राणहिता या नद्या प्रदूषित आहेत. त्याचबरोबर मुंबईत मिठी, पुण्यातील मुळा-मुठा, ठाण्यातील उल्हास, कोल्हापुरात पंचगंगा या नद्या प्रदूषित आहेत. कोल्हापुरात साखर कारखाने आणि विशेषतः इचलकरंजीतील वस्त्रोद्योगामुळे पंचगंगेचे पाणी मोठ्या प्रमाणावर प्रदूषित होत आहे. जलशक्ती मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, देशातील 80 टक्क्यांहून अधिक लोकांना, म्हणजेच दहा पैकी आठ जणांना जमिनीतून पाणी मिळते. भूजलातील घातक धातूंचे प्रमाण निर्धारित प्रमाणापेक्षा जास्त असल्यास ते पाणी ‘विष’ बनते. भारतातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या खेड्यांमध्ये असल्याने आणि तेथे हातपंप, विहिरी, नद्या, तलाव यातून थेट पाणी मिळत असल्याने ही समस्या अधिक गंभीर आहे.

देशात 209 जिल्ह्यांत भूजलामध्ये प्रति लिटर 0.01 मिलीग्रॅमपेक्षा जास्त आर्सेनिक आढळून आले. 491 जिल्ह्यांत भूजलातील लोहाचे प्रमाण प्रति लिटर एक मिलीग्रॅमपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले. 11 राज्यांतील 29 जिल्ह्यांमध्ये भूजलातील कॅडमियम 0.003 मिलीग्रॅम प्रति लिटरपेक्षा अधिक, तर 16 राज्यांतील 62 जिल्ह्यांतील काही भागांमध्ये क्रोमियमचे प्रमाण 0.05 मिलीग्रॅम प्रति लिटरपेक्षा जास्त आहे. 152 जिल्ह्यांत भूजलात 0.03 मिलीग्रॅम प्रति लिटर युरेनियम जास्त आहे. निरोगी राहण्यासाठी व्यक्तीने दिवसातून किमान दोन लिटर पाणी प्यावे. मात्र, प्रदूषित पाणी प्यायल्यास त्याचा थेट परिणाम आरोग्यावर होतो. कर्करोग, किडनीचे आजार होऊ शकतात. त्यामुळे पाणी शुद्ध करूनच प्यावे लागणार आहे. आज संपूर्ण जगात पेयजल संकटाचा विषय खूपच गहन बनला आहे. कुठे तो भूजल स्खलन रूपाने तर कुठे नद्यांच्या प्रदूषण रूपाने पाहायला मिळतो. सुकलेले तलाव आणि आकसलेली सरोवरे पाहायला मिळतात. तर जलस्तरही घटत चालला आहे. आज संपूर्ण युरोपातील 60 टक्के औद्योगिक क्षेत्रे आणि शहरी केंद्रे भूजल घटाच्या गंभीर समस्येचा सामना करत आहेत. आणखी काही देह अशाच गंभीर समस्येला तोंड देत आहेत. पेयजल संकट म्हणजे निसर्गाच्या आणि त्यांच्या संसाधनांच्या अनावश्यक खर्चाचा परिपाक आहे. दरवर्षी वाढत्या तापमानामुळे पृथ्वीचा जलस्तर तीन मीटरने खाली जात आहे. बदलत्या पर्यावरणाने काही ठिकाणे वाळवंटात रूपांतरित झाली आहेत. अशा भयाण परिस्थितीत पाण्याची बचत हीच आजची सर्वात मोठी गरज आहे.परंतु पाण्याच्या कमतरतेचे संकट आपल्या डोक्यावर टांगले असतानाही लोकांचे ध्यान जाताना दिसत नाही. आज पाण्याच्या शुद्धतेच्यादृष्टीने अनेक प्रयत्न केले जात आहेत. स्वच्छ पाण्यासाठी बहुतेक माणसे (शहरात राहणारे) घरी आणि कार्यालयात आरओ फुरिफायरचा वापर करतात. यामुळे लाखो लीटर पाणी वाया जात आहे. आरओमुळे पाणी बरेच शुद्ध होत असले तरी एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे की, काही आरओ फ्युरिफायर पाणी शुद्ध करण्याच्या प्रक्रियेत सुमारे तीन पट पाणी वाया घालवतात. पण जर आपण थोडी काळजी घेतल्यास आणि समजुतदारपणा दाखवल्यास पाणी गटारीत सोडून वाया घालवण्यापेक्षा त्याचा उपयोग अन्य कामासाठी केल्यास नासाडी होणाऱ्या पाण्याचा सदुपयोग होईल. धुणीभांडी, कपडे धुणे, फरशी पुसणे अशा अनेक कामांसाठी हे पाणी उपयोगाला येऊ शकते.

वास्तविक आरओची आवश्यकता अशा ठिकाणांसाठी योग्य आहे, जिथे पाणी खूपच खारे आहे. आरओ मशीनचा सर्वात पहिल्यांदा वापर 1949 साली अमेरिकेतील फ्लॉरिडामध्ये झाला होता. या वापरामागचा उद्देश म्हणजे खारे पाणी गोड करणे. नंतर या उपकरणाद्वारा पाण्याची मोठ्या प्रमाणात होत असलेली नासाडी आणि शरीराला आवश्यक असणारे खनिज नष्ट होत असल्याचे परिणाम समोर आले. जिथे पाण्यातील टीडीएसची मात्रा 500 मिग्रॅपेक्षा कमी आहे,तिथे सामान्य फ्युरिफायरच्या मदतीने पाणी शुद्ध करता येते.

# चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न : किशोर कुमार

आधुनिक केसरी

**किशोर कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न आहे. किशोर कुमार यांच्या जादुई आवाजाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी पूर्वीइतकीच लोकप्रिय आहेत. किशोर कुमार यांनी चित्रपट सृष्टीवर असा ठसा उमटवला आहे की त्यांच्या नावाशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया व्यक्तिमत्त्व असलेले किशोर कुमार यांचा काल जन्मदिन होता. त्यांना जयंतीनिमित्त अभिवादन!**



चित्रपट निर्मितीतील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात त्यांचा सहभाग नाही. पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक असे चित्रपट निर्मितीतील सर्वच प्रकारात त्यांनी मुक्त विहार केला. किशोर कुमार यांचे मूळ नाव आभास कुमार गांगुली असे होते. ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते तर आई गौरादेवी या गृहिणी होत्या. त्यांचे थोरले बंधू अशोक कुमार आणि अनुप कुमार हे दोघेही हिंदी चित्रपट सृष्टीत नायक म्हणून कार्यरत होते. किशोर कुमार हे देखील आपल्या भावांप्रमाणे चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडत होते. १९५० साली कुंजलाल गांगुली यांनी किशोर कुमार यांना मुक्कदर या चित्रपटात काम दिले. १९५२ ते १९६० या दरम्यान किशोर कुमार यांनी बऱ्याच चित्रपटात काम केले. नोकरी, अधिकार, धोबी डॉक्टर, ईलजाम, मिस माला, झलक हे चित्रपट त्यांनी १९५४ या एकाच वर्षात पूर्ण केले. १९५६ साली तर त्यांनी ९ चित्रपटात भूमिका केल्या. हा त्याकाळी एक विक्रम होता. त्यानंतर ते अभिनयासाठी गायनही करु लागले. अभिनय आणि गायन असा त्यांचा समांतर प्रवास सुरू झाला. किशोर कुमार यांनी आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन आणि संगीताचा तालावर थिरकने असा नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. किशोर कुमार यांच्या या नवीन स्टाईलने तरुणांना भुरळ घातली. त्याकाळातील सर्व दिग्गज नायिकांसोबत त्यांनी भूमिका केल्या. मधुबाला सोबत त्यांची जोडी विशेष जमली. अभिनयासोबत गायनातही ते यशस्वी होऊ लागले. त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली. किशोर कुमार यांना संगीतकार सचिन देव बर्मन यांनी अनेक संधी दिल्या. सचिन देव बर्मन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. पुढे सचिन देव बर्मन यांचे चिरंजीव राहुल देव बर्मन उर्फ पंचमदा यांच्याशी जोडी जमली या जोडीने अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट सृष्टीला दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबत त्यांनी शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांनी तीन दशकांहून आधीक काळ गायन केले. देव आनंद यांच्यापासून अनिल कपूर यांच्यापर्यंत सर्वच नायकांना त्यांनी आवाज दिला. किशोर कुमार यांचा आवाज ज्या नायकासाठी वापरला गेला तो नायक स्टार बनला. राजेश खन्ना यांना बॉलिवूडचा सुपरस्टार बनवण्यामागे किशोर कुमार यांचाही मोठा हात आहे. राजेश खन्ना यांच्या सर्व चित्रपटांमध्ये किशोर यांचाच आवाज वापरला गेला. आराधना पासून जमलेल्या या जोडीने पुढे इतिहास घडवला. या जोडीची सर्व गाणी हिट झाली. ज्या ज्या वेळी राजेश खन्ना यांचे नाव निघते त्या त्या वेळी किशोर कुमार यांचेही नाव घेतले जाते. किशोर कुमार यांनी ४०० हुन अधिक चित्रपटात शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. नायक, गायक यासोबत ते दिग्दर्शकही होते. चलती का नाम गाडी यासारख्या विनोदी चित्रपटसोबतच दूर गगन की छाव मे यासारखा गंभीर चित्रपटही त्यांनी काढला. त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिले तर काही चित्रपटांसाठी गाणीही लिहिली. किशोर कुमार यांनी चित्रपटाच्या पटकथाही लिहील्या. असा हा हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू १३ ऑक्टोबर १९८७ रोजी जगाला अलविदा करून कायमचा निघून गेला.

**-श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मातृहृदयी व्याख्याते : प्रा.डॉ. ह.भ.प. रामकृष्ण बदने

आधुनिक केसरी

**आधुनिक काळातही संतांचे मानवतावादी विचार जन सामान्यांमध्ये पेरण्याचे कार्य  अनेक व्यक्ती अविरतपणे करीत आहेत, सामान्य माणसांच्या मनांत राष्ट्रभावना, धर्मभावना जागवून त्यांना मानवतेची, मातृ-पितृसेवेची शिकवण देत आहेत. अशांपैकीच एक म्हणजे मातृ हृदयी व्याख्याते ह.भ.प. प्रा. डॉ. रामकृष्ण बदने हे होत.  ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय, वसंतनगर ता. मुखेड येथील हिंदी विभागाचे प्रोफेसर व महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा. डॉ. ह. भ. प. रामकृष्ण बदने यांचा आज दि. ०५ आगस्ट १९६८ रोजी वाढदिवस. त्या निमित्त केलेला हा शब्दप्रपंच.**

मराठवाडा ही संत-महंतांची, शूर विरांची आणि विचारवंतांची भूमी आहे. विशेषतः वारकरी संप्रदायाच्या जडणघडणीमध्ये मराठवाड्याचे योगदान अतिशय महत्त्वाचे गणले जाते. संत नामदेव (नरसी नामदेव), संत ज्ञानेश्वर आणि त्यांची भावंडे (आपेगाव, पैठण), संत मंडळांमध्ये नामयाची दासी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संत जनाबाई (गंगाखेड), संत गोरोबा काका (ढोकी, उस्मानाबाद), संत एकनाथ ( पैठण) आदी वारकरी संतांनी मराठवाड्याची भूमी तयार केलेली आहे. संत तुकारामांच्या अभंगवाणीचा प्रभाव येथील संप्रदायावर सर्वदूर पडलेला आहे. वारकरी संप्रदायाच्या परंपरेत येथील अनेक संत महंत मंडळी राहून संप्रदायाचे कार्य पुढच्या पिढीपर्यंत अव्याहतपणे चालू ठेवलेले आहे. अशा काळात वारकरी संप्रदायाचा सच्चा पाईक बनून राष्ट्रसंत भगवानबाबा, संत मोतीराम महाराज, संत माधवबाबा मोळवणकर, गूरुवर्य मारोतराव महाराज दस्तापुरकर आदींनी वारकरी संप्रदायाचा प्रसार आणि प्रचार सर्वदूर, दुर्गम वाडी, तांडा, वस्ती- वस्तीवर केला. त्यांच्याच प्रेरणेने मराठवाड्यात संत विचारांची अनेक माणसं तयार झालीत. जे या आधुनिक काळातही संतांचे मानवतावादी विचार जन सामान्यांमध्ये पेरण्याचे कार्य अविरतपणे करीत आहेत, सामान्य माणसांच्या मनांत राष्ट्रभावना, धर्मभावना जागवून त्यांना मानवतेची, मातृ-पितृसेवेची शिकवण देत आहेत. अशांपैकीच एक म्हणजे मातृ हृदयी व्याख्याते ह.भ.प. प्रा. डॉ. रामकृष्ण बदने हे होत.

प्रा.डॉ.रामकृष्ण बदने यांचा जन्म ०५ऑगस्ट १९६८ रोजी लातूर जिल्ह्यातील किनगाव जवळ असलेल्या देवकरा ता. अहमदपुर या छोट्याशा खेड्यात एका वारकरी  कुटुंबात झाला. त्यांच्या आई-वडिलांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाकीची होती. तरीही त्यांनी आपल्या मुलांना शिकविण्याची तयारी ठेवली.

**शिक्षण :**

डॉ. बदने यांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या गावी म्हणजे देवकरा येथेच झाले. त्यानंतरचे शिक्षण किनगाव येथील जिल्हा परिषद, शाळेत झाले. शालांत परीक्षेपर्यंतचे शिक्षण गावाहून ऊन, वारा, पाऊस, थंडी सहन करत पायी प्रवासाने झाले. सुट्टीच्या दिवशी आई- वडीलांना घरकामात, शेतीत, रोजंदारीवर, गायी- गुरं सांभाळत मदत करत करत मॅट्रीक पर्यंतचे शिक्षण पूर्ण करून पुढे ते अकरावी - बारावीच्या शिक्षणासाठी अहमदपूर येथील नामांकित महात्मा गांधी महाविद्यालयात दाखल झाले खरे; परंतु येथे राहण्याचा मोठा पेच होता. शिक्षण घेण्याच्या जिद्दीपुढे त्यांनी परिस्थितीशी दोन हात करत पडेल ते काम स्वीकारले. ते याच महाविद्यालयात हिंदी, इतिहास, राज्यशास्त्र विषय घेऊन मोठ्या गुणानुक्रमे उत्तीर्ण झाले.पदवी शिक्षणात गुणवत्तेत आल्यामुळे त्या काळात त्यांचा शासकीय महाविद्यालय, परभणी येथे बी.एड. शिक्षणाकरिता प्रवेश झाला व त्यांनी हे प्रशिक्षण पूर्ण केले. एवढ्यावरच न थांबता त्यांनी लातूरच्या दयानंद कला महाविद्यालयात एम.ए. हिंदी विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून विद्यापीठातून प्रथम क्रमांक मिळविला व त्यांना १९९२ साली हिंदी विषयात सुवर्णपदक प्राप्त झाले. त्यानंतर त्यांना ग्रामीण ( कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय, वसंतनगर, मुखेड येथे हिंदी विषयाचे अधिव्याख्याता म्हणून नोकरी मिळाली. संस्थेचा आधार सापडला. त्यांनी इमान- इतबारे अध्यापनाचे कार्य सुरू ठेवले. त्यांच्या अध्यापन कौशल्या बरोबरच त्यांच्या इतर अनेक गुण ठासून भरलेले होते. त्यामुळे ते पुढील काळात स्वस्थ न बसता एक उपक्रमशील प्राध्यापक, प्राचार्य म्हणून नावलौकिकास पात्र ठरले. नोकरी करत करत त्यांनी प्राध्यापक पदाची पात्रता परीक्षा ( सेट ) उत्तीर्ण करून पुढे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात 'नागार्जुन के कथा साहित्य मे जनवादी चेतना' या महत्वपूर्ण विषयावर संशोधन करून 'विद्यावाचस्पती' ही मानाची पदवी प्राप्त केली.

**भूषविलेली पदे :**


डॉ.रामकृष्ण बदने यांनी आपल्या महाविद्यालयात हिंदी विषयाचे अध्यापन कार्य करत संस्थेने त्यांना दिलेली उपप्राचार्य, प्राचार्यपदाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली व महाविद्यालयाच्या नावलौकिकांत भर टाकली. महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी म्हणून त्यांनी केलेले काम अत्यंत स्तुत्य आहे. ग्रामीण भागातील अडीअडचणी कशा असतात हे स्वयंसेवक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांना जाणीव करून दिली व शिबिर काळात त्या त्या गावात लोकांना प्रबोधन केले. त्यांचे कार्य पाहून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने त्यांना २०१७- १८ साली विभागीय समन्वयक पदाची जबाबदारी सोपविली. ही जबाबदारी देखील त्यांनी लीलया पेलली. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या बहिःशाल व्याख्यानमाला विभागात आणि विद्यार्थी कल्याण मंडळ यांच्या सल्लागार पदी राहून केलेले कार्य दिशादर्शक आहे. याशिवाय महाराष्ट्र शासन वृद्ध साहित्यिक व कलावंत निवड आणि मानधन वाटप समितीच्या सदस्य पदी राहून गुणी साहित्यिक व कलावंतांना न्याय मिळवून दिला. कै. मक्काजी नाईक वाङ्.मय पुरस्कार समिती वसंतनगर ता.मुखेडच्या सदस्यपदी राहून वाङ्.मय लेखनाची चळवळ गतिमान केली. तसेच इंडियन रेडक्रॉस समिती सदस्य, मुखेड, कै. वसंतराव नाईक व्याख्यानमाला सदस्य, मुखेड, अध्यक्ष मायबोली मराठी परिषद, मुखेड,  मातोश्री भिमाई पुंडे स्मृती व्याख्यानमाला सदस्य आणि महाविद्यालयातील विविध समित्यावर कार्यरत राहून साहित्यसेवा व समाजसेवा मोठ्या तन्मयतेने सरांनी जोपासून दुर्गम भागात प्रबोधनाचा जागर घातलेला आहे.

**ग्रंथ लेखन कार्य :**

डॉ.रामकृष्ण बदने हे एक लेखक म्हणून देखील सुप्रसिद्ध आहेत. त्यांचे नागार्जुन के कथा साहित्य मे जनवादी चेतना, बोलू काही थोरांविषयी,विचारधन यशस्वी जीवनाचे या स्वतंत्र ग्रंथ लेखनाबरोबरच अर्वाचीन हिंदी काव्य,  कर्मवीर किशनराव राठोड यांच्यावरील गौरव ग्रंथ 'विमुक्त',  'गीता अमृताचा प्रवाहः रामकृष्ण महाराज आणि वारकरी संप्रदाय' या महत्त्वाच्या ग्रंथाचे संपादन कार्य सरांनी केले आहे.  याशिवाय अनेक ग्रंथांना प्रस्तावना, वार्षिक अंकांचे, स्मरणिकेचे संपादन तसेच दिवाळी विशेषांक, साहित्य पत्रिका, संशोधन पत्रिका, वर्तमानपत्रे आदिंमध्ये त्यांचे लेखन प्रसिद्ध झालेले आहे.त्यांनी आतापर्यंत अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये आपले संशोधन लेख सादर केले असून नामांकित संशोधन ग्रंथात ते प्रसिद्ध झाले आहेत.

**व्याख्याते, प्रवचनकार :**

डॉ. रामकृष्ण बदने यांची खरी ओळख एक सुप्रसिद्ध व्याख्याते व उत्कृष्ट कीर्तनकार प्रवचनकार म्हणून अधिक आहे. त्यांची खरी अभिरुची वाचन लेखनाबरोबरच व्याख्यान कीर्तन,प्रवचन,समाजसेवा म्हणून अधिक असल्याचे आवर्जून सांगता येईल. महाराष्ट्रातील विशेषतः मराठवाड्यातील जवळपास नामांकित महाविद्यालयात त्यांची व्याख्याने नावाजलेली आहे. 'आई' या विषयावर त्यांनी आजपर्यंत हजारो व्याख्याने देऊन तरुणाईच्या मनात देशभक्ती बरोबरच मातृभक्ती निर्माण करण्याचे काम डॉ.बदने सरांनी  केले आहे. त्यांनी आपल्या व्याख्यानातून मांडलेल्या आई विषयीच्या सह्रदय भावना आईची महती जागविणाऱ्या आहेत.आईकडे दुर्लक्ष करणाऱ्यांच्या मनात आईची, तिच्या वात्सल्याची जाणीव निर्माण करणारी त्यांची व्याख्याने आजही गच्च गर्दीने होऊन ऐकणाराचे डोळे पाणावताना दिसून येतात. अलीकडच्या काळात मातृभक्ती बरोबरच पितृभक्तीवर देखील त्यांची व्याख्याने वडिलांच्या कर्तृत्वाची जाणीव करून देणारी आहेत. 'आधी केले मग सांगितले' या उक्तीप्रमाणे डॉक्टर बदने यांनी आपल्या आई-वडिलांची सेवा करून मातृॠण व पितृॠण फेडण्याचे कार्य केले आहे. अत्यंत हळव्या मनाचे डॉ. बदने सर तितक्याच रोखठोक शब्दांत आपल्या कीर्तनातून, प्रवचनातून जनसामान्य माणसाला प्रबोधन करताना दिसून येतात. सामान्य माणसाला माता माउल्यांना आपल्या जीवनाची किती कर्तव्यता तितक्याच तन्मयतेने समजावून सांगतात. वारकरी संप्रदायाचा खरा आचारधर्म कोणता आहे ?याविषयी ते सामान्य जणांना डोळस भक्ती महात्म्य शिकवतात. अगदी मातृह्रयी भावनेने आपल्या विद्यार्थ्यांना मुलांना शिकवताना दिसून येतात. त्यांनी आपल्या आयुष्यात कधीही वाकडे पाऊल टाकलेले नाही अथवा कुणाचे मन दुखावे अशा हिणकस भावनेने कोणाला अपमानित केले नाही तर ते नेहमी सर्वांना प्रेमाने आदराने बोलताना दिसतात. ही त्यांच्या व्यक्तिमत्वाची विशेष ओळख सहवासातल्या प्रत्येकाला भुरळ पाडणारी आहे. ते एकदा का एखाद्याच्या सहवासात आले की पुढे ते त्यांचेच होऊन जातात. त्यांच्या व्याख्यान,  प्रवचनाचा विशेष म्हणजे त्यांचे गोड गायन होय. त्यांचे गायन ऐकतच राहावे असे प्रत्येकाला वाटल्यावाचून राहत नाही. अलीकडच्या काळात त्यांची स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जीवन कार्यावर होणारी व्याख्याने आम जनतेच्या मनात घर करून बसत आहेत. उच्च विद्याविभूषित प्रोफेसर म्हणून वावरत असताना कधीही त्यांना अहंकार, गर्व, ताठा आलेला नाही तर ते नेहमी तळागाळातल्या, गाव खेड्यातल्या माणसांशी आपली नाळ जोडून आहेत.आपल्या शिक्षणाच्या काळातील गरिबीची जाणीव ठेवून आजही ते खेड्यापाड्यातील गोरगरिबांच्या, शेतकऱ्यांच्या, शेतमजुरांच्या मुला मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करताना दिसून येतात.



प्रो. डॉ. अनिल मुंडे
संपर्क क्र. : ९८८१८२८५६९

**प्राप्त पुरस्कार :**

डॉ. रामकृष्ण बदने यांना आपल्या एकूणच कार्याबद्दल अनेक प्रतिष्ठेचे व मानाचे पुरस्कार आज पर्यंत त्यांना प्राप्त झाले आहेत. पंचायत समिती, मुखेड कडून त्यांचा गुरुगौरव,  वैद्यकीय संस्था व पुंडे हॉस्पिटल यांच्याकडून गुनिजन व गुणगौरव पुरस्कार, कै. मक्काजी नाईक गुणवंत कर्मचारी पुरस्कार,  राज्यस्तरीय एकता गौरव पुरस्कार,  नेहरू युवा केंद्र व जिल्हाधिकारी महिला बचत गट विशेष कार्य प्रशस्तीपत्र,  रोटरी क्लब मुखेडकडून गुणगौरव, महात्मा फुले समाज रत्न पुरस्कार, मराठवाडा भूषण- वंजारी युवा संघटना महाराष्ट्र राज्य यांचा पुरस्कार, राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार, उत्कृष्ट साहित्यिक पुरस्कार,  विमुक्त ग्रंथास वाङ्.मय पुरस्कार, लोकमंगल सोलापूरचा आदर्श शिक्षक पुरस्कार, ग्रंथमित्र पुरस्कार, महात्मा ज्योतिबा फुले राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार, ज्ञानदीपची दीपावली पुरस्कार, महात्मा कबीर समता परिषदेचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार, मातोश्री भागाबाई डोंगरे प्रतिष्ठानचा माऊली रत्न पुरस्कार, महात्मा फुले सत्यशोधक शिक्षक पुरस्कार, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा उत्कृष्ट ग्रामीण शिक्षक पुरस्कार असे अनेक पुरस्कार सरांना प्राप्त झाले आहेत. पुरस्कार प्राप्त करण्यासाठी सरांनी कधीही हेतू ठेवून कार्य केले नाही तर या सर्व नामांकित संस्थानी त्यांच्या कार्याचे कौतुक म्हणून त्यांना हे पुरस्कार प्रदान केले आहेत. सरांनीही समाज ॠण फेडण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. मी गेल्या १७-१८ वर्षांपासून सरांच्या सहवासात आहे. वाचन लेखनाबद्दल सर मला नेहमी मार्गदर्शन करीत असतात. सर आणि मी मिळून अनेक ठिकाणी प्रवचने दिली आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सरांना अनेकदा व्याख्यानांसाठी निमंत्रित केले आहे.एक सत्शील प्रवृत्तीचे , निर्व्यसनी व्यक्तिमत्त्व म्हणून सरांना ओळखले जाते. आज सरांचा जन्मदिन त्यानिमित्ताने त्यांना खूप खूप शुभेच्छा देऊन यापुढेही त्यांचे समाजोपयोगी कार्य निरंतर चालू राहावे अशी अपेक्षा करतो.

लेखक महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, जि. लातूर येथील मराठी विभागात कार्यरत आहेत.

# नीती आणि नियम बनवण्यात सरकारची महत्त्वाची भूमिका

आधुनिक केसरी

**हिमालयाच्या दुर्गम भागात अमरनाथ यात्रेचे आयोजन भारताची क्षमता आणि इच्छा दर्शवते. हा भूप्रदेश धोकादायक असूनही आणि त्या उंचीवर चढण्यासाठी चांगल्या आरोग्याची गरज असूनही यात्रेकरूंची संख्या दरवर्षी वाढत आहे. यातून यात्रा सुरक्षित करण्यासाठी सरकारचे वाढते प्रयत्न तर दिसून येतातच शिवाय सरकारकडून पुरवल्या जाणाऱ्या सुविधांबाबत लोकांचा विश्वासही दिसून येतो, पण यात्रेकरूंच्या प्रचंड गर्दीच्या पार्श्वभूमीवर हिमालय असुरक्षित बनला आहे का, असा प्रश्न पर्यावरणतज्ज्ञांना पडला आहे. हिमालयाच्या कुशीत अनेक धार्मिक आणि नैसर्गिक पर्यटनस्थळे आहेत. हिमालयातले सौंदर्य देशभरातल्या पर्यटकांना आपल्याकडे खेचून आणते; परंतु वाढते पर्यटक आणि त्यांनी निर्माण केलेला कचरा हिमालयाला असुरक्षित बनवत आहे. वारंवार होणाऱ्या भूस्खलनालाही पर्यटकांची वाढती संख्याच कारणीभूत असल्याचे तज्ज्ञ सांगतात. ही समस्या किती गंभीर आहे? ती कशी दूर करता येणार?**

अमरनाथ गुहेजवळ ढगफुटीमुळे अचानक आलेल्या पुरामुळे किमान 16 जणांचा मृत्यू झाला तर जम्मू-काश्मीरमध्ये अडकलेल्या 15 हजार यात्रेकरूंना सखल भागात असलेल्या पंजतरणी छावण्यांमध्ये हलवण्यात आले. गेल्या दोन वर्षांमध्ये करोनामुळे काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आदी भागात पर्यटक आले नव्हते. पर्यटन व्यवसाय अडचणीत आला होता. करोनातून सावरत असताना आता पर्यटक दोन वर्षांचा बॅकलॉग भरून काढत आहेत, असे एकंदर चित्र आहे. अमरनाथ यात्रेसाठी नोंदणी झालेल्या भाविकांच्या संख्येवरून आणि हिमाचल प्रदेशातल्या हॉटेलमधल्या रुम्सच्या आरक्षणावरून हे स्पष्ट झाले आहे.

भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव अपूर्व चंद यांनी सांगितले की, यंदा सुमारे सात-आठ लाख यात्रेकरू भेट देतील, अशी अपेक्षा आहे. यावेळी केंद्र सरकारने यात्रा मार्गांवर पोलीस आणि लष्कराव्यतिरिक्त केंद्रीय राखीव दलाचे आणि इतर केंद्रीय दलांचे 40 हजारांहून अधिक जवान तैनात केले आहेत. यादरम्यान यूएव्हीद्वारे पाळत ठेवण्याबरोबरच ड्रोन हल्ला रोखण्यासाठी काऊंटर-ड्रोन यंत्रणादेखील तैनात केली जाते. 2012 च्या सरकारी आकडेवारीनुसार, 2009 मध्ये अमरनाथ यात्रींची संख्या सुमारे चार लाख होती. 2012 मध्ये वाढून ती 6.21 लाख झाली.

जम्मू-काश्मीरमधल्या अशांततेमुळे जुलै 2016 मध्ये अमरनाथ यात्रा स्थगित करण्यात आली होती. मात्र चारधाम यात्रेसाठी प्रवाशांची संख्या वाढली आहे. यंदा बद्रीनाथ यात्रेला जाणाऱ्यांची संख्या खूप जास्त आहे. तज्ज्ञांच्या मते यात्रेकरूंची जास्त संख्या हे मृत्यूच्या मोठ्या संख्येमागील मुख्य कारण असू शकते. उत्तराखंड पर्यटन विभागाच्या आकडेवारीनुसार दररोज सुमारे 55 ते 58 हजार यात्रेकरू चारधाम तीर्थक्षेत्री पोहोचत आहेत. ही संख्या मागील वर्षांच्या तुलनेत सुमारे 15 हजारने जास्त आहे.

यावर्षी यात्रेच्या सुरुवातीपासूनच आठ लाखांहून अधिक भाविक चारधामवर पोहोचले आहेत. सुमारे 10 लाख लोक येणे बाकी आहे. पर्यटकांवर लक्ष ठेवण्यासाठी आवश्यक धोरण राबवणाऱ्या काठमांडूच्या ‘इंटरनॅशनल सेंटर फॉर इंटिग्रेटेड माऊंटन डेव्हलपमेंट’चे महासंचालक डेव्हिड मोल्डन म्हणतात, नीती आणि नियम बनवण्यात सरकारची महत्त्वाची भूमिका असते. या नाजूक पर्यावरणातल्या पर्यटकांच्या संख्येवर लक्ष ठेवण्यासाठी, शाश्वत ‘इको-टूरिझम’ तसेच स्थानिक व्यवसायाला चालना देण्यासाठी स्थानिक आणि राष्ट्रीय स्तरावर धोरण तयार करण्याची गरज आहे. जम्मू विद्यापीठातल्या भूगोल विभागाचे माजी प्राध्यापक एम. एन. कौल म्हणतात की, या विषयावर वैज्ञानिक दृष्टिकोनातून अधिक अभ्यास आवश्यक आहे. अमरनाथची गुहा चुनखडी आणि जिप्समपासून बनली आहे. पर्यटकांद्वारे निर्माण होणारी उष्णता स्टॅलेग्माईटच्या आकारावर परिणाम करते. यात्रेकरूंच्या वाहतुकीव्यतिरिक्त पर्वत मोहिमांमुळे हिमनद्यांचा, पर्यायाने पर्यावरणाचा ऱ्हास होतो. चारधाम यात्रेसाठी भाविक मोठ्या संख्येने येत असल्यामुळे तज्ज्ञांनी पर्यावरणाबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. नामशेष होत असलेल्या वनौषधींचा धोका अधिक असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

‘हायर प्लांट हिमालयन रिसर्च इन्स्टिट्यूट’ (एचएपीआरईसी) चे संचालक प्रोफेसर एम. सी. नौटियाल म्हणाले, केदारनाथ परिसरातल्या मौल्यवान वनौषधी नष्ट होत आहेत. जटामासी, आतिश, बरमाळा, काकोळी यासह काही प्रमुख औषधी वनस्पती नामशेष झाल्या आहेत. हे सर्व तीव्र हवामान बदलामुळे होत आहे. या प्रदेशात मानवी हस्तक्षेप वाढत आहे. जम्मू-काश्मीर सरकारने अमरनाथ यात्रेदरम्यान कचरा साफ करण्यासाठी इंदूर आयआयटीच्या ‘स्वाह’ या स्टार्टअपशी हातमिळवणी केली आहे. अहवालानुसार, या प्रवासादरम्यान एक हजार टनांपेक्षा जास्त कचरा निर्माण होत असल्याचा अंदाज आहे. याबाबत तज्ज्ञ चिंतेत आहेत. ताज्या स्वच्छता अभियानात इंदूरमधल्या सुमारे 350 लोकांनी स्वेच्छेने सहभाग नोंदवला. अमरनाथ यात्रेदरम्यान प्लॅस्टिक आणि डिस्पोजेबल साहित्याचा वापर न करण्याच्या सूचना सरकारने दिल्या आहेत. ‘स्वाहा’ने शून्य ‘लॅंडफिल इव्हेंट’ सादर केला आहे. याअंतर्गत इथे निर्माण होणारा सर्व कचरा पारंपरिक पद्धतीने जमिनीखाली टाकण्याऐवजी पुनर्वापर केला जाणार आहे. यासोबतच त्यातून सेंद्रीय खतेही बनवली जाणार असून ती प्रवाशांना भेट म्हणून दिली जाणार आहेत.

# वैवाहिक जीवनात असफल ठरलेले : किशोर कुमार



सुरेश सिरसीकर
संपर्क क्र. 9146040000

आधुनिक केसरी

**४ ऑगस्ट १९२९ किशोर कुमारचा जन्म दिवस. किशोर कुमारला कोण ओळखत नाही आज ही त्याचे फॅन जगभरात आहेत. जवळपास प्रत्येक घरात, गाडीत किशोर कुमारचे गाणे वाजत असतात. ऑन-स्क्रीन किशोर कुमार कितीही सफल असले तरी त्यांचे वैयक्तिक आयुष्यही तितकेच घटनापूर्ण आणि दोलायमान होते. वयाच्या ५८ व्या वयात त्यांची चार लग्न झाली. चार - दोन वर्षानंतर त्यांचा संसार मोडायचा. बाकी किशोर कुमार तर सर्वांना माहीतच आहेत, आज आपण त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे वैवाहिक जीवन जाणून घेऊयात.**


किशोर कुमारने भारतीय पार्श्वगायक, अभिनेता, दिग्दर्शक आणि निर्माता अशी चार ही विभागात आपला ठसा उमटविला आहे. पण गायक म्हणून भारतीय संगीताच्या इतिहासातील सर्वोत्कृष्ट आणि गतिमान गायक तसेच भारतीय उपखंडातील सर्वकाळातील सर्वोत्कृष्ट गायकांपैकी एक म्हणून तो मोठ्या प्रमाणावर ओळखले जातात. ते भारतीय चित्रपट उद्योगातील सर्वात लोकप्रिय गायकांपैकी एक गायक होते, जो त्याच्या योडेलिंग आणि वेगवेगळ्या आवाजात गाण्याची क्षमता यासाठी प्रसिद्ध होता. किशोर कुमार वेगवेगळ्या शैलींमध्ये गायचे आणि हीच शैली रसिकांनी डोक्यावर घेतली आणि किशोर कुमार मोठे गायक बनले.

**रुमा गुहा ठाकुर्ता**

रुमा गुहा ठाकुर्ता ही सत्यजित रे यांची भाची होती. किशोरकुमार रुमा गुहा ठाकुर्ता च्या प्रेमात पडले आणि १९५० मध्ये प्रथमच सत्यजित रे यांच्या भाचीशी लग्नगाठ बांधली, जी कलकत्ता युथ कॉयरचे संस्थापक देखील होते.१९५२ ला या जोडप्याने अमित कुमार ला जन्म दिला. परंतु काही वर्षांनी रुमाच्या कारकिर्दीबद्दल कथित भांडणे होऊ लागली. किशोर कुमारची इच्छा नव्हती की रुमा लग्नानंतर काम करावं. किशोरला तिच्या इच्छेविरुद्ध गृहिणी बनवायचे होते. शेवटी १९५८ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला. रुमा २००६ च्या हॉलिवूड चित्रपट नेमसेकमध्ये दिसली होती. हृषिकेश मुखर्जीचा अभिमान या वास्तविक जीवनातील प्रेमकथेपासून प्रेरित असल्याचे म्हटले जाते. हा विवाह फक्त सात वर्ष टिकला.

**मधुबाला**

सौंदर्यवती म्हणून जिचा उल्लेख आज ही होतो ती म्हणजे मधुबाला. आज ही तिच्या सौंदर्याचे करोडो फॅन आहेत. दिलीप कुमार सोबतच्या प्रेमभंगाने ती आतून तुटून गेली होती. त्याच वेळी झुमरू आणि चलती का नाम गाडीच्या निमित्ताने तिच्या आयुष्यात आला हसमुख किशोर कुमार. मधुबालाला वेंट्रिक्युलर सेप्टल डिफेक्ट (हृदयातील छिद्र) होते. त्यावर तिचे उपचार चालू होते. किशोर कुमार मधुबाला वर भाळला होता. किशोरने मधूबालाला तिच्या वेंट्रिक्युलर सेप्टल डिफेक्टच्या (हृदयातील छिद्र) उपचारासाठी लंडनला जाण्याचा विचार करत असतानाच तिला प्रपोज केले. हिंदू असल्यामुळे पालक राजी होणार नाहीत म्हणून किशोर कुमारने तिच्या पालकांच्या खुशीसाठी इस्लाम स्वीकारला आणि करीम अब्दुल हे नाव स्वीकारून किशोरने मधुबालाशी निकाह केला. निकाह नंतर १९६० मध्ये किशोरने मधुबालाशी हिंदू विवाह करून देखील किशोर कुमारच्या कुटुंबाने कधीही तिला स्वीकारले नाही. वाढत्या तणावामुळे तिची तब्येत बिघडत गेली.तब्येत बिघडल्याने लग्नानंतर महिनाभरातच तिला वांद्रे येथील घरी परतावे लागले. १९६९ मध्ये त्यांच्या निधनाने हा विवाह संपला. त्यामुळे हा विवाह ९ वर्ष जरी टिकला असला तरी मधुबाला फक्त महिना भरच किशोरकडे राहू शकली. किशोर कुमार दोन तीन महिन्यातून एकदा तिला भेटायचे.



रुमा गुहा ठाकुर्ता



मधुबाला



योगिता बाली



लीना चंदावरकर

**योगिता बाली**

सात वर्षांनंतर किशोर कुमार शम्मी कपूरची पत्नी गीता बालीची भाची योगिता बालीच्या प्रेमात पडले आणि १९७६ मध्ये योगिता बालीशी लग्न केले. परंतु हे लग्न ही फक्त दोन वर्षच टिकले कारण योगिता बाली मिथुन चक्रवर्ती यांच्या प्रेमात पडली आणि किशोरशी घटस्फोट घेऊन मिथुन चक्रवर्ती शी लग्न केलं त्यामुळे किशोर कुमार ने मिथुन चक्रवर्ती ला आपला आवाज कधीच दिला नाही. बप्पी लहरी च्या आग्रह खातर एक गाणे गायले होते. या विवाहाला किशोरने आपल्या एका मुलाखतीत " हा विवाह म्हणजे विनोद होता " असं म्हणाले होते.

**लीना चंदावरकर**

आपल्यापेक्षा २१ वर्ष लहान असलेल्या लीना चंदावरकर यांच्या प्रेमात किशोर पडले. आणि १९८० मध्ये लीना चंदावरकर किशोर कुमारने लग्न केले. त्यावेळी लीना चंदावरकर ही २५ वर्षांची विधवा होती. तिचे पहिले लग्न सिद्धार्थ बांदोडकर (गोव्याचे पहिले मुख्यमंत्री, दयानंद बांदोडकर यांचा मुलगा) सोबत झालेला होता. पतीच्या अपघाती मृत्यूने ती तरुण वयात विधवा झाली होती. वयातील फरक व किशोर कुमार ची अनेक लग्ने यामुळे सुरुवातीला या लग्नाला चंदावरकर कुटुंबाचा विरोध होता. या जोडप्याने सात वर्षे संसार केला आणि १३ ऑक्टोबर १९८७ मध्ये हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने किशोर कुमारचे निधन झाले. आणि हे लग्न ही सात वर्ष टिकले.या जोडीने सुमित ला जन्म दिला. किशोर कुमार आपल्या कारकीर्दीत किती ही सफल असले तरी त्यांचे वैवाहिक जीवन मात्र संघर्षमयच होतं, असफल होतं.

# भारताला ऐतिहासिक सुवर्णपदक मिळवून देणारा 'लॉन बॉल्स'

आधुनिक केसरी

**इंग्लंडमधील बर्मिंगहॅम येथे २०२२ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेत भारताची चांगली कामगिरी सुरू आहे. खेळांच्या पाचव्या दिवशी भारताने लॉन बॉल्स खेळामध्ये 'ना भूतो ना भविष्यती' कामगिरी केली आहे. भारतीय महिला लॉन बॉल्स संघाने स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच सुवर्ण पदक पटकावले आहे. लवली चौबे, रूपा राणी टिर्की, पिंकी आणि नयनमोनी सैकिया या चौघींनी शानदार कामगिरी करून इतिहास घडवला. या चौघींनी अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा १७-१० असा पराभव करून सुवर्णपदक जिंकले.**



लॉन बॉल्समध्ये भारताला सुवर्ण पदक मिळाल्याने अचानक हा खेळ प्रकाशझोतात आला आहे. अनेकांनी पहिल्यांदाच या खेळाचे नाव ऐकले आहे. कित्येकांच्या मनात, हा खेळ नेमका काय आहे? तो कसा खेळला जातो? असे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

लॉन बाल्स हा खेळ काही नवीन नाही. या खेळाचा उगम १२व्या शतकात झाला असे मानले जाते. सर्वात पहिल्यांदा इंग्लंडमध्ये हा खेळ खेळला गेल्याचे ऐतिहासिक पुरावे आहेत. १८व्या शतकामध्ये या खेळाशी संबंधित नियम बनवले गेले. काळाच्या ओघात या नियमांमध्ये बदल होत गेले आहेत.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या पहिल्या आवृत्तीपासून (१९३०) नियमितपणे हा खेळ खेळवला गेला आहे. केवळ १९६६मध्ये झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत त्याचा समावेश करण्यात आला नव्हता. राष्ट्रकुल क्रीडा सपर्धेतील नियमित क्रीडा प्रकार असूनही लॉन बॉल्सला अद्याप ऑलिंपिकमध्ये स्थान मिळालेले नाही. भारतातही हा खेळ अनेक दशकांपासून खेळला जात आहे. २०१० पासून राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतीय लॉन बॉल्स खेळाडूंनी पहिल्यांदा सहभाग घेतला होता.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या इतिहासामध्ये इंग्लंडने या खेळात वर्चस्व राखले आहे. त्यांनी आतापर्यंत २० सुवर्ण, ९ रौप्य आणि २२ कांस्य अशी एकून ५१ पदके जिंकली आहेत. २०१८ गोल्ड कोस्ट राष्ट्रकुल स्पर्धेत ऑस्ट्रेलियाने पाच सुवर्ण आणि दोन रौप्य पदके जिंकली होती. लॉन बाल्स हिरवळ असलेल्या सपाट पृष्ठभागावर खेळला जातो. या खेळाला 'आउटडोअर बाल्स' असेही म्हणतात. यात चार फॉरमॅट्स आहेत – सिंगल्स, पेअर्स, ट्रिपल्स आणि फोर्स. संघातील खेळाडूंच्या संख्येनुसार सर्व फॉरमॅटची नावे दिली गेली आहेत. एका लॉन बॉल्स गेममध्ये फक्त दोन संघ सहभागी होऊ शकतात. एका बॉलचे वजन साधारण १.५ किलोग्रॅम इतके असते.

**असे असतात नियम**

१) या खेळामध्ये आपला बॉल निश्चित केलेल्या लक्ष्याच्या जवळ आणावा लागतो. या लक्ष्याला 'जॅक' असे म्हणतात. खेळाडू जेव्हा बॉल फेकतो तो घरंगळत जॅकपर्यंत गेला पाहिजे.

२) एका टोकापासून विरुद्ध टोकाकडे असलेल्या जॅककडे जाताना किमान २३ मीटरचा प्रवास करावा लागतो.

३) प्रत्येक संघ आपापले बॉल्स रोल करण्यासाठी एक वळण घेतो. सिंगल्स फॉरमॅटमध्ये प्रत्येक संघाला चारवेळा प्रयत्न करता येतात. तर इतर फॉरमॅटमध्ये, एका संघाला प्रति खेळाडू दोन थ्रो मिळतात. चार खेळाडूंच्या (फोर्स) फॉरमॅटमध्ये, प्रत्येक संघाला एका टोकापासून आठ थ्रो किंवा रोल्स टाकावे लागतात.

४) जो संघ किंवा खेळाडू जॅकच्या सर्वात जास्त जवळ जातील त्यांना जास्त गुण मिळतात.

५) विजेता ठरवण्यासाठी गुणांची गणना केली जाते. एकेरीत, २१ गुणांपर्यंत पोहोचणारा पहिला खेळाडू सामना जिंकतो. उर्वरित फॉरमॅटमध्ये, बॉल्स १८ वेगवेगळ्या टोकांपासून आणले जातात. यापैकी सर्वात जास्त चांगले थ्रो करणाऱ्या संघाला विजेता म्हणून घोषित केले जाते.

शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394
दिंडोरी चिट फंड प्रा.लि.
आपले जीवन आनंदमय जगा....
तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.
कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.
• सेंट्रल ॲक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त
• पासबुक व पावतीची सोय
• लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत
• सर्व व्यवहार धनादेशाद्वारे
संपर्क: श्री.सतीष देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला
३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट
गणिताच्या मूलभूत संकल्पना (१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त) MRP ₹ 430/- Offer Price ₹ 345/- पाने ५३४
गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त MRP ₹ 470/- Offer Price ₹ 375/- पाने ५३४
उखाण्यातून गणित मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज MRP ₹ 360/- Offer Price ₹ 280/- पाने ३६४
श्रीमती छायाताई खेडकर 8888780568
श्री. हरिभाऊ गिते सर 9422742712
गणेश बुक स्टॉल, भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकीजवळ, बीड मो. 8149196415
दत्तराज पार्क, बायपासरोड, सावतानगर, गेवराई मो. 8888780568/9422742712
माऊली अपार्टमेंट, मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ, धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910

# ...हा रस्ता रहदारीस योग्य नाही

## सबब... रहिवाश्यांनी संभाजीनगर सोडून जावे का?



### विद्यार्थी अक्षरशः गांगरून जातात हो

नगर परिषदेच्या वतीने या रस्त्याचे काम तातडीने करावे. आमच्या पाल्यांना शाळेत जाण्यासाठी हाच रस्ता आहे. पावसाच्या पाण्याने तुडुंब भरलेल्या खाचखळग्यातून मार्ग काढणे चिमुकल्यांसह वयोवृद्ध नागरिकांना अवघड होते.

सखाराम तुकाराम राऊत
विद्यार्थी पालक

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** चिखली शहरातील वर्दळीचा भाग असलेल्या संभाजीनगर परिसरात रहदारीच्या मुख्य मार्गावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. सध्या पावसाचे दिवस असून या खड्ड्यांमुळे अपघातही होऊ शकतो.

सुस्त नगर पालिका प्रशासनाने पावसाळ्यापूर्वी या रस्त्यावर किमानपक्षी मुरूम टाकणे आवश्यक होते. शहरातील सर्व भागात रस्ते चकाचक झाले असून संभाजीनगरमधील हा खाचखळगे युक्त मार्ग गत काळापासून सुधारणेची वाट बघत आहे. विकास योजनाचे पंचवार्षिक वारे इकडे कधी वळले नाही. या रस्त्यावर शाळा, महाविद्यालय असून विद्यार्थ्यांची रस्त्यावर तारांबळ उडते आहे. रस्त्यावर मधोमध मोठा खड्डा पडला असून वेळप्रसंगी अपघातही होऊ शकतो.

# शाळेमध्ये शाळापूर्व तयारी! शाळांमध्ये फायर ऑडिट कधी?

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** ग्रामीण भागातील शाळा पूर्व तयारी मेळावासह विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. नविन प्रवेश पात्र मुलांना पुष्प, चॉकलेट,



शैक्षणिक साहत्याचे वाटप करण्यात येत आहेत. मात्र संबंधित विभागाने शहरातील व ग्रामीण शाळांच्या अग्निसुरक्षेच्या दृष्टीने शाळा इमारतींचे फायर ऑडिट करण्याचे आदेश संबंधित विभागाच्या वतीने शिक्षण विभागाने द्यावे तसेच विद्यार्थ्यांचे मॉक ड्रिल करण्याबाबतही शाळांना सांगण्यात यावेत.

शाळेत लहान लहान मुले शिक्षण घेत असतात शाळेत कधीही कोणतीही अपघात घटना घडू शकते त्यासाठी प्रशासनाने अधिक सतर्क राहून प्रत्येक शाळेला प्रथोपचार पेटी सह अग्नी निवारक यंत्र बसविणे आवश्यक आहे. सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार राज्य सरकारच्या निर्णयानुसार राज्यातील सर्व शाळांमध्ये फायर ऑडिट बंधनकारक करण्यात आले आहे. तसे न केल्यास शाळेत कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्याला जबाबदार कोण? शाळांचे फायर ऑडिट अग्निशमन दलामार्फत करावे, शाळेमध्ये शाळापुर्व तयारी! शाळांमध्ये फायर ऑडिट कधी? असे सजान नागरिकांसह पालकांकडून प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

# कामगार नेत्याला सायबर भामट्यांचा १० लाखांचा चुना

## वीज बील न भरल्याचे सांगून ठकवले; शहरातील दुसरी घटना

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जेष्ठ कामगार नेते साथी सुभाष लोमटे यांना सायबर भामट्यांनी ९ लाख ८९ हजार ८७७ रु.चुना लावला. या प्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात दाखल झालेला गुन्हा वेदांतनगर पोलिसांकडे (२/०८) काल दुपारी अडीच वा. वर्ग करण्यात आला आहे.

सुभाष लोमटे यांना २५ जुलै रोजी त्यांच्या मोबाईलवर मागील महिन्याचे वीजेचे बील अपडेट न झाल्याचा मेसेज आला. त्यांनी तो त्यांची पत्नी निलीमा मुरुगकर (६५) यांना फॉरवर्ड करत चेक करायला सांगितले. निलीमा यांनी मेसेज आलेल्या नंबरवर फोन केला असता भामट्याने त्यांना वीजेचे बील अपग्रेड न झाल्यामुळे १० रु. भरुन अपग्रेड करुन घ्या असे सांगितले. त्याप्रमाणे भामट्याने फोनवर सांगितलेल्या स्टेप फॉलो करताच निलीमा मुरुगकर यांच्या बंधन बँकेच्या खात्यातून ९ लाख ८९ हजार ८७७



रु. गायब झाले.

हा प्रकार कळल्यानंतर त्यांनी सायबर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दिली होती. पण सायबर पोलिसांनी तो गुन्हा वेदांतनगर पोलिसांकडे वर्ग केला. यापूर्वी असाच एक गुन्हा शहरात घडल्याचे पोलिसांनी सांगितले. तपास पोलिस निरीक्षक सचिन सानप यांच्या मार्गदर्शनाखाली वेदांतनगर पोलिस करत आहेत.

# मुख्य वनसंरक्षक, अधीक्षक अभियंत्यांच्या घरातून चंदनाची चोरी

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** येथील वनविभागाचे मुख्य वनसंरक्षक व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंत्या यांच्या निवासस्थानाच्या परिसरात असलेल्या तीन चंदनाची झाड तोडन चोरून नेली. चोरट्यांनी चौकीदारांना तलवार लावुन ही चोरी केली. काही दिवसापूर्वीच वनविभागाच्या अधिका-याच्या निवासस्थान परिसरातून चंदनाची झाड चोरून नेले होते. महिन्या भरातच चंदन चोरीची ही तीसरी घटना आहे.

मुख्य वनसंरक्षक वसंत घुले यांचे मेडीकल चौकात शासकीय निवासस्थान आहे. ३ ऑगस्ट रोजी रात्रीच्या सुमारास चोरट्यांनी त्या ठिकाणी प्रवेश केला. तेथील चंदनाचे झाड तोडून तेथून काढता पाय घेतला. त्यानंतर तेथून सार्वजनिक बांधकाम मंडळाचे अधिक्षक अभियंता यांच्या शासकीय निवासस्थानात प्रवेश केला. तेथील दोन चंदनाची झाडे तोडून चोरून नेली. सदर चंदन २ लाख ६० हजार रुपयाचे आहे. हा प्रकार उजेडात येताच चौकीदार आत्माराम भोदुजी चव्हाण यांनी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या प्रकरणी शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरु आहे.

**सीसीटीव्ही कॅमेरेही लंपास**

शहरातील अधिकाऱ्यांच्या निवासस्थानातील चंदनाच्या झाडावर चोरट्यांचा वॉच आहे. सदर झाड चोरण्यासाठी चोरट्यांनी अनेक घरांची रेकी केली. त्या ठिकाणी असलेले सीसीटीव्ही



कॅमेरे फिरवरुन ठेवले. एवढेच नव्हे तर चोरट्यांनी घटनेच्या पुर्वी सीसीटीव्ही कॅमेरे चोरुन नेले. सुरक्षेच्या दृष्टीकोणातून शहरील प्रत्येक शासकीय अधिका-यांकडे सीसीटीव्ही लावले आहे. सदर कॅमेरेही चोरून नेत असल्याने तपासात अडथळा निर्माण होत आहे.



# जिल्हास्तरीय टग ऑफ वॉर (रस्सीखेच) अजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणी

आधुनिक केसरी न्यूज

**बुलडाणा :** अहमदनगर जिल्हा टग ऑफ वॉर असोशिएशन च्या सहकार्याने व महाराष्ट्र टग ऑफ वॉर असोशिएशन च्या अधिपत्याखाली व टग ऑफ वॉर फेडरेशन ऑफ इंडिया च्या नियमानुसार 23 वी सबज्युनिअर व ज्युनिअर टग ऑफ वॉर (रस्सीखेच) राज्यस्तर अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन 15 ते 17 ऑगस्ट 2022 दरम्यान शिर्डी जि अहमदनगर येथे आयोजित करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने बुलडाणा जिल्हा टग ऑफ वॉर असोशिएशन ची सब ज्युनिअर व ज्युनिअर जिल्हास्तर स्पर्धा व निवड चाचणी दिनांक 6 रोजी सकाळी 12/00 वा सेंटर पब्लिक स्कुल मेहकर ता. मेहकर जि. बुलडाणा येथे आयोजित केली आहे. जिल्हास्तर स्पर्धेतुन श्री साईबाबा महाविद्यालय शिर्डी तालुका राहाता जिल्हा अहमदनगर येथे होणाऱ्या राज्यस्पर्धेसाठी बुलडाणा जिल्हाचा संघ निवडला जाणार आहे. सदर स्पर्धा खालील गटात होतील.

सबज्युनिअर वयोगट 13 वर्ष मुले वजन गट 380 कि.ग्रॅ मुली वजन गट 340 कि.ग्रॅ जन्म तारीख 01/01/2010 नंतर वयोगट 15 वर्ष मुले वजन गट 410 कि.ग्रॅ मुली वजन गट 360 कि.ग्रॅ जन्म तारीख 01/01/2008 नंतर सबज्युनिअर वयोगट 17 वर्ष मुले वजन गट 500 कि.ग्रॅ मुली वजन गट 420 कि.ग्रॅ मिक्स वजन गट 520 कि.ग्रॅ जन्म तारीख 01/01/2006 नंतर ज्युनिअर 19 वर्ष मुले वजन गट 560 कि.ग्रॅ.मुली वजन गट 460 कि.ग्रॅ.मिक्स वजन गट 540 कि.ग्रॅ. जन्म तारीख 01/01/2004 नंतर सदर जिल्हा टग ऑफ वॉर स्पर्धा व निवड चाचणीसाठी ज्या खेळाडुंना सब ज्युनिअर व ज्युनिअर गटामध्ये सहभागी होण्याचे आहे अशा खेळाडुंनी उपस्थित राहावे, असे आवाहान बुलडाणा जिल्हा टग ऑफ वॉर असोशिएशन अध्यक्ष छत्रपती पुरस्कार प्राप्त शेषनारायण लोढे व सचिव आंतरराष्ट्रीय खेळाडु श्रीराम निळे, कोषाध्यक्ष योगेश शर्मा यांनी केले आहे.

या स्पर्धेसाठी निवड समिती सदस्य म्हणुन आंतरराष्ट्रीय खेळाडु जिल्हा गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार प्राप्त श्रीराम निळे, राजकुमार शर्मा, गजेंद्र देशमुख, निलेश इंगळे, अमीत चाहरे, संतोष भुसारी, माधव मंडळकर निवड सदस्य समिती म्हणून निवड करण्यात आली आहे, असे जिल्हासचिव यांनी कळवले आहे.

# पुसद बसस्थानकात मोकाट जनावरे, कुत्र्यांचा मुक्त संचार

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** येथील बसस्थानक तीन वर्षापूर्वी विस्तारीत करण्यात आले. परिसर मोठा आहे. पण बसस्थानकात अनेक समस्या असल्याचे दृष्टीपथास पडते. याविषयी प्रवासीजणात नाराजी उमटली आहे. स्व. वसंतराव नाईक हे मुख्यमंत्री असताना १९७५ मध्ये पुसदला सुंदर बसस्थानक बांधल्या गेले. यवतमाळनंतर पुसदचे बसस्थानक आगार समृध्द प्रसिद्ध होते. पण आज हे बसस्थानक समस्यांच्या विळख्यात आले. स्थानकावर खड्डे पडले होते ते नुकतेच बुजविले ही बाब वगळता परिसर स्वच्छतेकडे पुर्णपणे लक्ष नाही. पुसद हे एसटी आगार हे मोकाट जनावरांचे निवासस्थान बनले आहे, असे दृश्य पहावयास मिळते.

प्रवाशांची वर्दळ कमी परंतु मोकाट जनावरांची मात्र इथे संचार, रेलचेल पहावयास मिळते. चौकशी कक्षाच्या बाजुला व पुस्तक भंडार उपहारगृहासमोर गाई बसून रवंथ करताना दिसून येतात. स्थानकात बेंच परिसरात कुत्री सैरावैरा धावताना व झोपलेली असतात. आगार प्रमुखांनी या मोकाट कुत्री, गाढव जनावरांचा बंदोबस्त करावा. पुसद आगार, बसस्थानक जनावरे कुत्री, गाढव यांचे आश्रयस्थान होत आहे. पुरूषांसह महिला, लहान बालक प्रवाश्यांना खरूजसारख्या रोगाची लागण झालेल्या कुत्र्यापासून रोग होण्याची भीती वाटत आहे.

मोकाट जनावरे आगारात मनसोक्त संचार करीत असल्याचे आगार व्यवस्थापक, आगार प्रमुखांच्या दृष्टीपथास पडू नये म्हणजे नवलच नव्हे का? पुसद आगारामध्ये येणाऱ्या प्रवाशांना मोकाट जनावरापासून कधीही इजा भी घडू शकते. मोकाट जनावर प्रवाशावर हल्ला करू शकतात, अशी शंकाही प्रवासी वर्गाकडून व्यक्त केल्या जात आहे. आगार व्यवस्थापकांनी कुत्री मोकाट जनावरांचा आगार स्थानकामध्ये संचार करणाऱ्या जनावरांचा बंदोबस्त करणार नाहीत का? असा प्रश्नही प्रवासी उपस्थित करीत आहेत.



# वडुज येथे मराठी साहित्य मंडळ, ठाणेची शाखा कार्यान्वित

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** मराठी साहित्य मंडळ ठाणे या प्रख्यात संस्थेची शाखा वडुज येथे कार्यान्वित करण्यात आली आहे. या वेळी कार्यकारिणी स्थापन करून सर्व पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभ शिवाजीकॉलेज वडूज येथे मान्यवरांच्या उपस्थितीत दिनांक ३/८/२०२२ रोजी छत्रपती शिवाजी कॉलेज वडूज येथे पार पडला. साहित्यिक सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये केलेल्या योगदानाची दखल घेऊन संस्थेच्या निवड समितीने मराठी साहित्य मंडळाची पदाधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली.

मराठी साहित्य मंडळ खटाव तालुका अध्यक्षपदी सौ. सीमा मंगरुळे यांना हे पद देण्यात आले त्यांना राज्यस्तरीय विविध सात ते आठ पुरस्कार प्राप्त आहेत तसेच त्यांचा अंतरंग हा काव्यसंग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे व त्याला राज्य स्तरीय पुरस्कारही मिळाला आहे.

मराठी साहित्य मंडळ खटाव तालुका उपाध्यक्षपदी. डॉ. एस. बी. पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी प्राणिशास्त्र या विषयावर पुस्तके लिहिली असून अनेक पुरस्काराचे ते मानकरी आहेत. तसेच शिवाजी कॉलेजचे प्रिन्सिपल म्हणून ते कार्यरत आहेत. तसेच मराठी साहित्य मंडळ सचिव म्हणून लाभलेले सुहास पवार हे नवजीवन हायस्कूल बिदाल येथे सध्या कार्यरत असून त्यांचे साहित्य क्षेत्रातील योगदान खूप मोठे आहे त्यांनी तीच पुस्तके लिहिली असून त्यांना राज्यस्तरीय अनेक पुरस्कार प्राप्त आहे. सदस्य म्हणून लाभलेल्या प्राध्यापक केंजळे मॅडम ह्या शिवाजी कॉलेज वडूज येथे मराठीच्या प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत तसेच त्यांना साहित्याची आवड आहे. या कार्यक्रमातील सदस्य म्हणून लाभलेल्या आरती काळे या नगरसेवक सेविका म्हणून वडूज मध्ये आहेत तसेच त्यांचे सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान आहे. अनिता गोडसे या गृहिणी असून त्यांना वाचनाची व लेखनाची आवड असून साहित्यामध्ये रस आहे त्यांचीही यास कार्यकारणी मध्ये सदस्य म्हणून नियुक्ती झाले आहे. मिलिंदा पवार या पत्रकार असून त्यांचे कविता करणे लेख लिहिणे इत्यादी गोष्टीत रस असल्यामुळे त्यांचीही या कार्यकारणी मध्ये निवड करण्यात आली आहे तेव्हा या सर्व कार्यकारीणी तीलपदाधिकाऱ्यांचे अभिनंदन नियूक्ती पत्र देवून करण्यात आले.




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छत्रपती शिवाजी कॉलेज वडूजच्या प्रा. डॉ. सविता गिरी मॅडम यांनी उत्कृष्टपणे पार पाडले. तसेच अध्यक्ष सीमा मंगरुळे यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले त्या म्हणाल्या की नवीन कवी कवयित्री व साहित्यिकांना योग्य मार्गदर्शन व संधी मिळावी हा या मंडळाचा उद्देश असणार आहे.

या कार्यक्रमांमध्ये वडूज मधील ज्येष्ठ विचारवंत सुरेश शहा व विनायक ठिगळे यांनी सर्वांना मोलाचे मार्गदर्शन केले.तसेच कार्यक्रमास आवर्जून उपस्थित असलेले जेष्ठ साहित्यिक प्रा. आवळे यांचेही मार्गदर्शन लाभले. तसेच सुहास पवार व एस.बी. पाटील यांनीही सर्वांना मार्गदर्शन केले व अशाप्रकारे मराठी साहित्य मंडळ खटाव पदाधिकारी पदग्रहण समारंभ कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# नाट्य निर्मात्यांनी आपण कुठे कमी पडतोय याचा विचार करावा

## अ. भा. मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांचे मत

आधुनिक केसरी न्यूज

पुणे : अ. भा. मराठी चित्रपट महामंडळाकडे सात हजारांहून अधिक चित्रपट निर्मात्यांची नोंद आहे, मात्र त्यापैकी पाचशेसुद्धा कार्यारत नाहीत, पुण्यातील १० सुद्धा सक्रिय नाहीत; तसेच नाट्य निर्मिती संस्था सुद्धा ५५ हून अधिक आहेत मात्र ५ सुद्धा सक्रिय नाहीत हे वास्तव आहे. बालगंधर्वच्या वर्धापन दिनानिमित्त चार दिवस सर्वजण उत्साही असतात मात्र त्यांनानंतर पुन्हा जैसे थे स्थिति असते. असे का? यांचा विचार करण्याची गरज आहे. मुंबईचे ३ - ४ निर्माते येतात आणि हाऊसफुलचा बोर्ड लावतात. आपण निर्मिती मूल्यांमध्ये, प्रसिद्धीमध्ये नेमके कुठे कमी पडत आहोत याचा विचार करण्याची आवश्यकता आहे, असे मत अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ आणि नाट्य निर्माता संघाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांनी व्यक्त केले.

पुण्यात स्वर सर्वेश प्रोडक्शन आणि सर्वज्ञ नाट्य संस्थायांच्या संयुक्त विद्यामाने मराठी नाटक दिग्दर्शक विनोद खेडकरयांच्या 'जानम समझा करो' आणि नृत्य दिग्दर्शक अर्जुन जाधव यांच्या बहारदारनृत्य संगीताचा कार्यक्रम 'वाजतंय ते गाजतंय' या कार्यक्रमाचा मुहूर्त सोहळा संपन्न झाला यावेळी मेघराज राजेभोसले बोलत होते. याप्रसंगी दोन्ही कार्यक्रमांचे निर्माते संतोष चव्हाण, अभिनेते माधव अभ्यंकर, ज्येष्ठ रंगकर्मी सुरेश देशमुख, अभिनेते सुरेश विश्वकर्मा, अभिनेता चेतन चावडा, हेमंत एदलाबादकर, मिलिंद शिंत्रे, योगेश जाधव, सागर पाठक, प्रशांत तपस्वी, विवेक वाघ,आदि मान्यवर उपस्थित होते.




निर्माते संतोष चव्हाण यांच्या मराठी नाटक 'जानम समझा करो' आणि सांगीतिक कार्यक्रम 'वाजतंय ते गाजतंय'च्या मुहूर्त प्रसंगी उपस्थित मान्यवर.

पुढे बोलताना मेघराज राजेभोसले म्हणाले, आपले निर्माते नाटकाच्या निर्मिती प्रक्रियेत उतरल्यानंतर सेटपासून काटकसर करायला सुरुवात करतात, ५-१० प्रयोग करूया हे आपल्याच डोक्यात येते, कलाकारांची निवड त्यांचे प्रश्न या सर्व प्रक्रियेत एकसंघपणा दिसत नाही अशी खंत त्यांनी व्यक्त केली. निर्मात्याला प्रत्येक प्रयोगाला येणे शक्य नसते यामुळे इतर सर्वांनी जबाबदारी, शिस्तीने वागले पाहिजे, शिस्त कलेसाठी असते. सर्वांनी आपलं म्हणून केलं पाहिजे, पुण्यात मोठे प्रयोग शक्य आहेत, नवीन कलावंतांना संधि आणि पर्यायी व्यवस्था या दोन्ही गोष्टी झाल्या पाहिजेत जेणेकरून नाटकांचे प्रयोग, दौरे थांबणार नाहीत यांची काळजी कलाकार, तंत्रज्ञ आणि निर्मात्यांनी घ्यावी असे आवाहन राजेभोसले यांनी केले.

निर्माते संतोष चव्हाण म्हणाले, आमच्या दोन्ही कलाकृतीमध्ये नावीन्यपूर्ण प्रयोग केले आहेत त्याला रसिकांची साथ मिळेल अशी अपेक्षा आहे. २३ ऑगस्ट रोजी दुपारी १२.३० वा. जानम समझा करो', तर सायंकाळी ५:३० वा. 'वाजतंय ते गाजतंय' पहिला प्रयोग रामकृष्ण मोरे नाट्यगृह पिंपरी येथे होणार आहे.

# इसलकर, गरड, जतकर आदर्श ग्रामसेवक पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा.रमेश वाघमारे**

**पुसद :** पंचायत समितीतील विजय इसलकर व भारत गरड जिल्हा आदर्श ग्रामसेवक पुरस्काराचे मानकरी ठरले. त्यांना यवतमाळ येथील जिल्हा परिषदेच्या वसंतराव नाईक सभागृहामध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन आदर्श ग्रामसेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी अमोल येडगे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदचे अति. मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके, पंचायत मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद गुडधे मंचावर उपस्थित होते. यावेळी पुसद पंचायत समिती अंतर्गत तीन आदर्श ग्रामसेवकांना यावेळी पुरस्कार प्रदान करण्यात आला. यामध्ये सन २०१७-१८ करिता विजय इसलकर सन २०१८-१९ करिता भारत गरड व सन २०२०-२१. करिता कल्पना जतकर यांचा समावेश आहे.



विजय इसलकर, कल्पना जतकर व भारत गरड यांचा पुरस्कार देऊन सत्कार करताना जिल्हाधिकारी अमोल येडगे.

# जळगाव जामोद येथील तरुणाची विहिरीत उडी घेऊन आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**जळगांव जामोद :** नगरपरिषदेच्या पाठीमागील वस्तीमध्ये राहणाऱ्या बावीस वर्षीय करण अजबराव तायडे या तरुणाने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना 3 ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजे दरम्यान उघडकीस आली.

सदर हा युवक दिनांक एक ऑगस्ट पासून घरातून निघून गेला होता. तो परत घरी आलाच नाही. तरुण मनोरुग्ण असून त्याला दारू पिण्याची सवय असल्यामुळे त्याने आत्महत्या केल्याचे समजते. करणचे वडील अत्यंत गरीब असून मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. सदर घटनेची माहिती विनोद झाडे यांनी करणच्या वडिलांना सांगितली असता अजाबराव तायडे यांनी जळगाव जामोद पोलीस स्टेशनला सदर घटनेची फिर्याद दिली. घटनेची माहिती मिळताच जळगाव जाऊन पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक किशोर घोडेस्वार सुनील वावगे तसेच बालकृष्ण पवार सचिन राजपूत निलेश पुंडे यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेहाला विहिरीतून बाहेर काढले सदर मृतदेहाला शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय येथे पाठविण्यात आले. जय भवानी रुग्णवाहिकेचे चालक दीपक तायडे यांनी तात्काळ रुग्णवाहिका उपलब्ध केल्याने त्यांची नागरिकांनी आभार मानले. शव विच्छेदनानंतर सदर मृतकाचे शव त्यांच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले. अत्यंत शोकाकुल वातावरणात कुटुंबीयांनी मृतक करण याचा दफनविधी केला. सदर तरुणाने व्यसनाधीनतेतून हे पाऊल उचलल्याचे समजते. पोलिसांनी फिर्यादी अजबराव तायडे यांच्या रिपोर्टवरून मर्ग दाखल केला. पुढील तपास जळगाव जामोद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक किशोर घोडेस्वार, पोलीस हेडकॉन्स्टेबल विनोद वानखडे पोलीस शिपाई योगेश निंबोळकर करीत आहेत.






आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट





महावीर घर संसार

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# संत शंकरस्वामी महाराजांनी आध्यात्मिक संपत्ती बहाल केली : पंढरीनाथ महाराज पगार

आधुनिक केसरी न्यूज



**शांताराम मगर**

**वैजापूर :** आपले चित्त भगवंताच्या पायी लावणे म्हणजे परमार्थ असून सर्व संपत्तीपेक्षा परमार्थ मधील संपत्ती महत्वाची आहे, संत शंकरस्वामी महाराजांनी अध्यात्मिक संपत्ती बहाल करून आपल्याला श्रीमंत केले असे प्रतिपादन संत शिवाई संस्थानचे अध्यक्ष, भागवताचार्य पंढरीनाथ महाराज पगार यांनी केले.
शिऊर येथे सुरू असलेल्या श्री संत शंकरस्वामी महाराज यांच्या २७७ व्या फिरता नारळी अखंड हरिनाम सप्ताह मध्ये दिनांक ४ रोजी त्यांचे कीर्तन झाले, "माझे चित्त तुझे पायी" या रचनेवर विवेचन करताना ते बोलत होते.
मानवी विकासाचे केंद्रस्थान म्हणजे हरिनाम सप्ताह असून, या सप्ताहाच्या माध्यमातून अध्यात्मिक विचारांची ऊर्जा मिळत असते, साधुसंतानी भारतीय संस्कृती टिकवली असल्याचे पंढरीनाथ महाराज पगार यांनी नमूद केले.

**आमदार बोरणारे यांची भेट, ७७ पोते साखरेची रक्कम सुपूर्द**

कोरोनाच्या प्रादुर्भावनंतर व्यापक प्रमाणात हा सप्ताह होत आहे, सप्ताह मध्ये भाविकांची लक्षणीय उपस्थिती दिसून येत आहे, वैजापूर तालुक्याचे आमदार रमेश बोरणारे यांनी आज या सप्ताह मध्ये भेट दिली व महाप्रसादसाठी ७७ पोते साखरेची रक्कम सप्ताह समितीकडे सुपूर्द केली. दरम्यान शिऊर या संतभूमीच्या विकास करण्यासाठी कटिबद्ध असून शिऊर गावात स्वागत कमान, अंतर्गत रस्ते, पेव्हर ब्लॉक, सभामंडप, प्रणिता तीर्थ विकासासाठी तब्बल सव्वा तीन कोटींचे अंदाजपत्रक तयार केले असल्याचे आमदार बोरणारे म्हणाले. यावेळी वैजापूरचे उपनगराध्यक्ष साबेर खान, जिल्हा परिषद सदस्य रामहरी जाधव यांच्यासह लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आमटीचे टॅंकर, ९ चुलांगण**

अखंड हरीनाम सप्ताहात अन्नदानाला विशेष महत्व आहे. अन्नदानाची सुरुवात श्री संत शंकरस्वामी महाराजांनी २७७ वर्षापूर्वीच सुरू केली होती, ही परंपरा कायम ठेवत आधिक व्यापक स्वरूपात वाढविण्यासाठी समाधी मंदिर विश्वस्त मंडळ व सप्ताह समिती प्रयत्नशील आहे. भाविकांना भोजनासाठी ट्रॅकरच्या माध्यमातून आमटी वितरित करण्याचे नियोजित आहे तर दि. ९ रोजी काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसाद वितरित करण्यात येणार आहे. जवळपास एक लाखावरून आधिक भाविक उपस्थित राहण्याचा अंदाज व्यक्त केला जात असून त्या दृष्टीने तयारी सुरू करण्यात आली आहे. तब्बल १११ पोते साखरेच्या माध्यमातून महाप्रसाद तयार करण्यात येणार असून यासाठी मोठे ९ चुलांगण तयार केले आहे.

**सप्ताहाची वैशिष्ट्य**

अखंड २४ तास चालणारे भजन... १५ मिनिटांत लाखो भाविकांना एकाचवेळी महाप्रसाद वितरण... या महाप्रसादासाठी गावागावांतून एकाचवेळी येणाऱ्या विनामूल्य लाखो भाकरी... एकाच वेळी तयार होणारी तब्बल पाच हजार लिटर आमटी.. अखंड चालणारे आमटी-भाकरी प्रसाद वितरण. सात दिवसाच्या या उत्सवात शेवटच्या दिवशी काल्याचे कीर्तन व महाप्रसादाचा कार्यक्रम असतो. अशा अनेकविध वैशिष्ट्यांचा हा सद्‌गुरू शंकरस्वामी महाराज सप्ताह असणार आहे.



# सावळदबारा येथे "घरोघरी तिरंगा झेंडा" रॅली काढून विद्यार्थ्यांनी दिल्या घोषणा

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे दि.४ रोजी जय कालिंका देवी शिक्षण संस्था संचलित शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय सावळदबारा व लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील वरिष्ठ महाविद्यालय सावळदबारा यांच्या संयुक्त विद्यमाने आज गावामध्ये "घरोघर तिरंगा" झेंडा रॅली काढण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष भाऊराव लक्ष्मणराव कोलते व सचिव रत्नाबाई नारायण कोलते व कार्यकारी संचालक मंडळ यांच्या सांगण्यावरून गावामध्ये तिरंगा झेंडाची रॅंली काढण्यात आली. "हर घर तिरंगा" हे ब्रीदवाक्य संस्थेचे अध्यक्ष भाऊराव कोलते यांनी सांगून आपल्याला स्वातंत्र्य मिळून 75 वर्षे पूर्ण झाल्यामुळे या अमृत महोत्सवी वर्ष संपूर्ण देश मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करीत आहेत. तेव्हा संस्था अध्यक्ष यांनी आपल्या सर्व संस्थेमध्ये व शाळेमध्ये सदरील अमृत महोत्सव हा अतिशय उत्साहात व आनंदात साजरा करावा. प्रत्येक शाळेला रंगरंगोटी करून वृक्षारोपण करून सजावट करून हा अमृत महोत्सव प्रत्येक घरापर्यंत कसा पोहोचणार यासाठी प्रत्येक शाळेने सावळदबारा गावामध्ये रॅली काढून जनजागृती केली व प्रत्येक घरावर आपल्या देशाचा तिरंगा कसा स्वाभिमानाने फडकेल यासाठी सर्व शिक्षक सर्व मुख्याध्यापक प्राचार्य शिक्षकेतर बंधू व संस्थाचालक या सर्वांनी प्रयत्न करावे, असे आवाहन प्रा.जीवन कोलते (सामाजिक कार्यकर्ते) यांनी केले.
त्यावेळेस छत्रपती शिवाजी विद्यालयाचे प्राचार्य नारायण रायभान कोलते यांनी आपल्या शाळेतील सर्व शिक्षक बंधू व शिक्षकेतर कर्मचारी यांना सर्व संस्थेच्या अध्यक्षांनी सांगितल्याप्रमाणे सावळदबारा गावात रॅली काढून प्रत्येक घरात व परिसरात प्रत्येकांनी तिरंगा ध्वज आपल्या घरावरती लावावा व त्याची जवाबदारी करावी व हा अमृत महोत्सव साजरा करण्यात यावा. हीच खरी भारतासाठी स्वातंत्र्य दिलेल्या हुतात्म्यांना व शहीद जवानांना आपल्याकडून श्रद्धांजली राहील, असे प्राचार्य पंजाबराव कोलते म्हणाले.
यावेळी विजयसिंह राजपूत, सुदाम राठोड, विनोद जाधव, भास्कर खमांट, मुकुंदा व्यवहारे, श्रीकृष्ण सोनवणे, भास्कर ससाणे, संजय जोशी, विकास पाटील, ज्ञानेश्वर राठोड, पोपटराव सोनवणे, भूषण देसले, शाम जाधव, अजाबराव चव्हाण, पंजाबराव शेळके, सतीश गावंडे, दिलीप सिसोदे, अजय रबडे, योगेश थोटे, गणेश मोहने, बाबासाहेब कोलते, अमोल गवई पाटील व सर्वशिक्षक कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.



# नगरसेवक रेलन यांचा पत्रकार परिषदेद्वारे समाचार घेणार : आ.फारूक शाह

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** साक्री रोडची दुरुस्ती, डांबरीकरण आणि लाईट लावण्याचे काम आम्ही केले. मात्र काल नगरसेवक हर्ष रेलन यांनी आपण लबाड बोलतो, असा आरोप केला. तर उद्या पत्रकार परिषद घेऊन लबाड कोण? याचा सोक्ष - मोक्ष लावणार आहोत. नगरसेवक रेलन स्वतःला अभ्यासू म्हणवता, मात्र कधी अनिल गोटेंनी काम केले, कधी आम्ही पाठपुरावा केला, तर कधी आ. फारुक शाह यांनी निधी आणला, म्हणून आभार मानतात. अशा वेळी लबाड कोण? हे त्यांनीच सांगावे. यासह शहर विकासाचा निधी बाबतही उद्या पत्रकार परिषदेत समाचार घेणार असल्याचे आ. फारुक शाह यांनी म्हटले आहे.
आज धुळे शहरातील प्रभाग क्र. ७ मधील मोगलाई ड्रायव्हर गल्ली येथे रस्ता कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना आ. शाह यांनी वरील माहिती दिली. अपना मेडिकल ते जुमा मस्जिदपर्यंत नागरिक मुलभूत सुविधा निधीतून ७४ लाख रुपये खर्चातून कॉंक्रीटीकरण रस्त्याचे उद्‌घाटन आ.डॉ. फारुख शाह यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अशपाक हाजी महेमुद, तारिक हाजी ताहेर, सादिक शेख, मजहर मिर्झा, राजु सैय्यद, पापा हाजी, जावेद शाह, सलीम मामु, माजी नगरसेवक अनिल दामोदर, आबिद शाह, डॉ. शकील देशमुख, डॉ. बी.यु.पवार, नगरसेवक नासिर पठाण, आसिफ शाह, सबिर पत्रकार व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# फर्दापूर पोलिसांची अवैध धंद्यावर मोठी कारवाई

## विविध भागात दोन जुगार अड्डे व हातभट्टी दारुवर धाडी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील पिंपळवाडी, देव्हारी व नादांतांडा येथे फर्दापूर पोलिस ठाण्या अंतर्गत गुप्त खबऱ्याकडून गुपनिय माहिती मिळाली. त्या अधारे सपोनि देविदास वाघमोडे यांनी दि. २ रोजी फर्दापुर पोलीस ठाणे, सावळदबारा पोलिस चौकी हद्दीतील सपोनि देविदास वाघमोडे यांना त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत पोस्टे हद्दीत सुरु असलेल्या अवैध धंदयाची खात्रीलायक माहिती मिळाल्यावर फर्दापूर पोलीस ठाणे नेमणुकीतील पोलीस अधिकारी व अमलदार यांचे पथक तयार करून फर्दापुर पोलीस ठाणे हद्दीत २ जुगार व १ दारु अवैध धंदावर वेगवेगळ्या तिन ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे. सविस्तर माहिती पुढील प्रमाणे पिंपळवाडी येथे जुगार खेळणाऱ्या ५ इसमांवर कारवाई करून ८८७००/- रुपये किंमतीचे जुगार साहित्य व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पाच आरोपी यांचे विरुद्ध फर्दापूर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १०१ / २०२२ मुंबई जुगार कायदा कलम २२ अ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
नांदातांडा येथे जुगार खेळणाऱ्या ३ इसमांवर कारवाई करुन १६००/ रुपये किमतीचे जुगार साहित्य व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपीत यांचेविरुद्ध फर्दापूर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १००/ २०२२ मुंबई जुगार कायदा कलम १२ अ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
देव्हारी येथे गावठी हातभट्टी दारुची विक्री करणाऱ्या इसमावर कारवाई करुन १०००/- रुपये किमतीची १० लिटर हातभट्टीची दारू व रसायन जप्त करण्यात आले असून आरोपी यांचे विरुद्ध फर्दापूर पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरील नमुद गुन्हयात एकुण ९ आरोपींवर कारवाई करुन ११,३००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कारवाई फर्दापूर पोलीस स्टेशनचे सपोनि देविदास वाघमोडे, उपनिरीक्षक रणजीत कासले, गोपाळ, मिरखॉं तडवी, विनोद कोळी, प्रदिप बेदरकर यांनी केली आहे. यामुळे सावळदबारा परिसरात मात्र जन्ना मन्ना खेळण्याचे धांबे चांगलेच दणाणले आहे.

# मराठा क्रांती मोर्चाच्या युवकांनी बांधले शिवबंधन



आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** आज मौजे बाहेगव्हाण तालुका वडवणी येथील मराठा क्रांती मोर्चाचे सक्रिय कार्यकर्त्यांनी शिवसेनेचे शिवबंधन बांधले. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या विचाराने प्रेरित होऊन मराठवाडा संपर्क नेते चंद्रकांत खैरे आणि शिवसेना संपर्कप्रमुख धोंडू पाटील यांच्या मार्गदर्शकाने, शिवसेना जिल्हाप्रमुख आप्पासाहेब जाधव यांच्या नेतृत्वाखाली व वडवणी तालुका प्रमुख संदीप माने यांच्या मार्गदर्शनाखाली आज सोमनाथ मस्के, उत्तरेश्वर गायकवाड, पवण साबळे या मराठी क्रांती मार्चाच्या कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.
यावेळी उपस्थित शिवसेना जिल्हाप्रमुख आप्पासाहेब जाधव, वडवणी तालुका प्रमुख संदीप माने, माजी नगरसेवक अशोक आळणे, उपतालुकाप्रमुख अतुल उगले, बालासाहेब बादाडे, प्रदीप तांबे, बाळासाहेब मेंडके कल्याण बल्लाळे सुखदेव धुमाळ, अनिल ढगे, महादेव वैराळे आणि शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

# डाक विमा व सुकन्या समृद्धी योजनेचा नागरिकांनी लाभ घ्यावा : सुवर्णा जगताप



आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** भारतीय स्वातंत्र्याची ७५ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त अमृत महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असून भारतीय डाक विभागाने १८ ते ६५ या वयोगटातील नागरीकांसाठी अतिशय महत्वपूर्ण योजना आणली असुन सर्व सामान्य नागरिकांच्या खिशाला परवडण्यासारखी ही योजना आहे. फक्त ३९९ रु. वार्षिक रक्कम या योजनेसाठी भरावयाची असून त्याचे फायदे ही तेवढेच आहेत. तसेच आरोग्याच्या दृष्टीकोनातून फायदेशीर अशी योजना आहे आरोग्यमं धनसंपदा प्रत्येकाला सुदृढ व निरोगी आयुष्य महत्वाचे आहे पण काही आपत्ती आली तर आपल्याकडील या योजनेतून आपण आर्थिक सहकार्य घेऊन दुखण्यावर इलाज करू शकतो तसेच ० ते १० वर्षाखालील मुलींच्या भविष्यासाठी सुकन्या योजना आली असून या योजनेचाही लाभार्थ्यांनी फायदा घ्यावा, असे प्रतिपादन लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती सुवर्णा जगताप यांनी केले आहे.

ब्राह्मणगाव (वनस) येथे आयोजित भारतीय डाक विमा मेळावा व सुकन्या समृद्धी योजनेच्या शुभारंभ प्रसंगी त्या बोलत होत्या. भारतीय डाक विमा मेळाव्याचे अध्यक्षस्थानी भाजपा महिला आघाडी जिल्हाध्यक्ष तथा सभापती सुवर्णाताई जगताप होत्या तर व्यासपीठावर सरपंच प्रमिला चौधरी, लासलगाव भाजप मंडळ अध्यक्ष तथा ब्राह्मण महासंघ कार्याध्यक्ष स्मिता कुलकर्णी, चांदवड डाक विभाग अधिकारी राजेंद्र वानखेडे, भाजपा जिल्हा चिटणीस ज्योती शिंदे, उपसरपंच नरहरी कापडी, माजी सरपंच रघुनाथ शिंदे, मा सरपंच केदु चौधरी, ज्येष्ठ नागरिक धोंडीराम तोडकर, वनसगाव सरपंच महेश केदारे, चांदवड डाक विभाग दिलीप दिवेकर, अनिल सोनवणे, वनसगाव पोस्ट मास्तर ऋषिकेश म्हस्के, असलम मुलानी, ग्रा.पं. सदस्य सुनीता वाघ आदी होते. सर्व उपस्थित मान्यवरांचा ग्रा पं च्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

भारतीय डाक विभागाने सर्वच घटकांना एक महत्त्वकांक्षी योजना आणली असून ग्रामीण भागात बहुतांश नागरिकांना योजना माहिती होत नसल्याने त्या बहुतांश योजनेपासून वंचित राहतात. याकरिता लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून सर्वप्रथम ही विमा योजना लासलगाव येथे धुमधडाक्यात पार पडली असून लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कर्तव्यदक्ष सभापती सुवर्णा जगताप यांच्या मार्गदर्शनाने लासलगाव येथे दोन दिवसीय विमा मेळावा घेतला. त्यात १११० नागरिकांनी या योजनेचा लाभ घेतल्यामुळे देशात लासलगावने प्रथम मानांकन मिळविले आहे तसेच ही योजना ग्रामीण भागात सभापतींच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून वनसगाव येथे घेण्यात आलेला मेळाव्यात ४४० लाभार्थ्यांनी लाभ घेतल्यामुळे वनसगाव डाक विभागाने भारतात ३ क्रमांक मिळविला आहे, असे गौरवोद्गार यावेळी चांदवड डाक विभाग मुख्य अधिकारी राजेंद्र वानखेडे यांनी केले आहे.

यावेळी लासलगाव भाजप मंडळ अध्यक्ष स्मिता कुलकर्णी म्हणाल्या की, सभापती सुवर्णा जगताप यांचे सामाजिक कार्य निश्चितच भुषणावह असून त्यांनी कोरोना काळामध्ये सामाजिक बांधिलकी जपत सातत्याने आरोग्य विभागाशी संपर्क साधत परिसरातील नागरिकांना लस उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. सद्यस्थितीत त्यांच्या मार्गदर्शनाखाली डाक विमा व सुकन्या योजना सुरू असून नागरिकांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभत आहे. या मेळाव्यात माजी सरपंच रघुनाथ शिंदे, उपसरपंच नरहरी कापडी आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.

वनसगाव डाक विभागाने भारतात ३ रा क्रमांक मिळविल्याने यावेळी पोस्ट मास्तर ऋषिकेश म्हस्के व असलम मुलानी तसेच भाजयुमो तालुका उपाध्यक्षपदी सागर शिंदे यांची नियुक्ती झाल्याबद्दल सभापती सुवर्णाताई जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी बहुसंख्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केंद्रीय पत्रकार संघाचे संघटक पत्रकार रामभाऊ आवारे यांनी केले तर आभार वनसगावचे सरपंच महेश केदारे यांनी मानले.



## औराळ्यांच्या वतीने हर घर तिरंगा उपक्रमाबाबत जनजागृती मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** स्वातंत्र्यदिनाच्या अमृतमहोत्सवानिमित्त हर घर तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याने या विविध ग्रामपंचायती, शाळा, महाविद्यालयात याबाबत नियोजन सुरू आहेत. या उपक्रमाची माहिती व जनजागृतीसाठी कन्नड तालुक्यातील औराळा येथील न्यु हायस्कूल शाळेमार्फत विद्यार्थ्यांनी प्रभातफेरी काढून याबाबत "हर घर तिरंगा" या उपक्रमाबाबद जनजागृती केली.

या प्रभातफेरीत विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर असलेले घोषवाक्याचे तयार केलेले फलक हातात घेत भारत माता कि जय, वंदे मातंरम, जय जवान जय किसान या घोषणा देत प्रभातफेरी काढत हर घर तिरंगा या उपक्रमाची जनजागृती केली. हि प्रभातफेरी शाळेपासून निघाली व संपूर्ण गावात फेरी करत पुन्हा शाळेच्या प्रारंगणात ह्या प्रभातफेरीची सांगता करण्यात आली.

या प्रभातफेरी मुख्याध्यापक कैलास नलावडे, पर्यवेक्षक एस.पी. दाभाडे, एस.एस.बागुल, ए.एम. राजपूत, एम.एल. खडबडे, जे.एस.बिरारी, जी. एस.नाईक, श्रीमती झेड.आर.गांगुर्डे, ए.ए.नलावडे, आर.के.पवार, बी.जी.शेख, आर.व्ही.जाधव, ए.एम.जैस्वाल, श्रीमती एस.डी. कमानदार, कसबे, बी.बी. आहेर, डी.आर.वाघ, ए.यू.नलावडे, आर.एम.काटकर, डी.एम. पारधी, ए.डी.वडगावकर, श्रीमती एस.एस.साळुंके, श्रीमती एन.बी.निकम, निवारे, चव्हाण या शिक्षकांनी व ग्रामस्थांनी सहभाग घेतला.

## 'घरोघरी तिरंगा' उपक्रमात सहभागी व्हावेः उत्तम चव्हाण



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील देव्हारी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त दि.१३ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत "घरोघरी तिरंगा" हा उपक्रम देव्हारी ग्रामपंचायत कार्यालयात राबविण्यात येणार आहे. नागरिकांना योग्य दरामध्ये झेंडा विकत घेता यावा यादृष्टीने जिल्हाभरात व सोयगाव तालुक्यात झेंडा विक्री केंद्र सुरु करण्यात येत असून देव्हारी ग्रामपंचायत कार्यालयात सुरु करण्यात आलेल्या तिरंगा झेंडा विक्री केंद्राचा शुभारंभ उपसरपंच मिराबाई उत्तम चव्हाण व ग्रामविकास अधिकारी सुरेश काळे यांच्या हस्ते आज करण्यात आला.

यावेळी शामिर तडवी सरपंच, शाळेये समितीचे अध्यक्ष विठ्ठल चव्हाण, नरेंद्र ठाकूर, नेमीचंद जाधव, सुकलाल कारभारी, तेजराव जाधव, सोनू ठाकूर, प्रेमसिंग राठोड, गुलाब टेलर, करतार चव्हाण, अंशु ठाकूर व ग्रामपंचायत कर्मचारी सर्व ग्रामपंचायत सदस्य, शिक्षकवर्ग आदींची उपस्थिती होती.

देव्हारी ग्रामपंचायत कार्यालयाच्या परिसरात सुरु करण्यात आलेले झेंडा विक्री केंद्र हे सुट्टीचे दिवस वगळता सकाळी १० ते सायं. ६ या वेळेत सुरु राहणार असून प्रती झेंडा ३० रुपये एवढी किंमती असणार आहे. देव्हारी येथील नागरिकांनी दि.१३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत आपल्या घरावर तसेच प्रत्येक शासकीय, निमशासकीय, खासगी आस्थापना, सहकारी संस्था, शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या कार्यालयाच्या इमारतीवर तिरंगा फडकवून या महोत्सवात उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविण्याचे आवाहन तंटामुक्ती अध्यक्ष उत्तम चव्हाण देव्हारी ता.सोयगाव यांनी यावेळी केले.

## अनेकांच्या जीवनात आनंद निर्माण करणारे लैंगिक विकारतज्ज्ञ : डॉ. ए. एच. शेख

आधुनिक केसरी

त्यांनी नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरीची स्थापना केली. या डिस्पेन्सरीच्या माध्यमातून डॉ. शेख यांनी लैंगिक विकारांवर उपचार करण्यास सुरूवात केली.

जेंव्हा नवजीवन डिस्पेन्सरी स्थापन केली तेव्हा लोक डॉ. शेख यांना हसायचे! लैंगिक विकाराचाही डॉक्टर असू शकतो, याबाबत लोकांना आश्चर्य वाटायचे व त्यामुळे ते डॉक्टराकडे पाहून हसायचे. हे हसणे डॉक्टर शेख यांनी मनावर घेतले नाही. तथापि, लैंगिक विकारावर लोक उघडपणे बोलत नसतं. डॉक्टर शेख यांनी लोकांची ही मानसिकता ओळखून लैंगिक विकारांवर उपचार करण्याची सुरूवात केली. आजपर्यंत दीड लाख लोकांवर त्यांनी उपचार केलेले आहे. लैंगिक विकारांवर उपचार ही समाजाची गरज आहे व ही गरज ओळखून डॉ. शेख यांनी आजपर्यंत अनेकांचे जीवन सुखी केले आहे.

किशोरवयीन जीवनातच लैंगिक शिक्षणांची खरी गरज असते. या वयातील मुले लैंगिक विषयावर फारसे बोलत नाहीत. कोणासमोर कसे बोलावे, ही अडचण या मुलांसमोर असते. मुले मुली हे आपल्या शरीरातील बदलांचे परिणाम जाणून घेण्यास उत्सुक असतात. पण असे काही बोलण्याची त्यांना लाज वाटत असते. अशा मुला- मुलींना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी डॉ. शेख यांनी पार पाडलेली आहे.

लैंगिक कमजोरीची अनेक कारणे असतात. अपुरा आहार, झोप नसणे, दर रोजची धावपळ, नको ती चिंता यामुळे लैंगिक कमजोरी येत असते. व्यसनामुळेही लैंगिक कमजोरी येत असते. त्या सर्व कमजोरीवर डॉ. शेख यांनी उपचार केलेले आहेत. लैंगिक विकारावरील उपचार हे आयुर्वेदिक असल्याने त्याचा शरीरावर कोणताही साईड इफेक्ट होत नसतो.

इंटरनेट, मोबाईल, पोर्न व्हीडियो पाहून मुला- मुलींकडून काही चुका होत असतात. अशा वेळी या मुलांना योग्य मार्गदर्शन पालकांकडून, शाळा, कॉलेजातून व डॉक्टरांकडून व्हायला हवे. डॉ. शेख हे संकोच बाळगणाऱ्या मुला-मुलींना समुपदेशन करत असतात. नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी हे अशा लैंगिक विकार ग्रस्तांसाठी एक आशेचा किरण ठरलेले आहे. डॉ. शेख यांनी विकाराग्रस्तांवर भारतातील रुग्राणांवर जसे उपचार केले आहेत, तसे त्यांनी परदेशातील रुग्णांवरही उपचार केले आहेत. या सर्व वैद्यकीय सेवेबद्दल डॉ. शेख यांना आजपर्यंत हजारो पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)




डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

## सौंदर्याचा सल्ला





डॉ. उज्ज्वला दहिफळे
(एम.सी.एच.प्लास्टिक सर्जरी)
ॲस्थॅटिक, लेसर ॲण्ड प्लास्टिक सर्जन

### अजून यौवनात मी... (ब्रेस्ट रिकन्स्ट्रक्शन - स्तन प्रत्यारोपण)

आधुनिक केसरी

"यहाँ वहाँ सारे जहाँ तेरा राज है। जवानी हो दिवानी तू जिंदाबाद । तारुण्य हा प्रत्येकाच्या जीवनातील संपूर्ण आयुष्यातील सुवर्णकाळ, उत्साह, नटखटपणा, स्वतःच्या व्यक्तीमत्त्वाची छाप समोरच्या व्यक्तीवर पाडण्याकरीता आपली शरीरयष्टी आकर्षण कशी दिसेल याचा प्रयत्न... पण यामध्ये एखाद्याच्या व्यक्तीमत्त्वात (शारिरीक दोष) कमीपणा असला तर... तारुण्याची मजा निघून जाते. विशेषतः मुलींच्या / मध्यम वयातील महिलांच्या बाबतीत स्तन विकसित नसतील तर... उन्नत उरोज हा पुरुषांना आकर्षित व महत्त्वाचा अवयव असून शास्त्रीयदृष्ट्या त्याचे मोठे महत्त्व आहे. त्यात जर कमतरता असेल तर... स्तन उन्नत करण्याकरिता प्लास्टिक सर्जरीच्या माध्यमातून उन्नत उरोज प्राप्त होऊ शकतात ते कसे याबाब..."

प्रत्येक मानव (स्त्री-पुरुष) आईच्या पोटातून बाहेरच्या जगात आल्याबरोबर इवलेशे डोळे उघडण्याअगोदर हे सुंदर जग बघण्याआधी त्याची सर्वप्रथम ओळख, त्याचा स्पर्श होतो स्तनाशी (ब्रेस्टो). स्तन तोंडात घेऊन चुटूक-चुटूक दूध पितो. दूध पोटभर पिल्यानंतर एक शांत झोप काढतो किंवा मग डोळे उघडतो व आई व इतरांना बघतो. बाहेरचे जग बघायला सुरुवात करतो. अशा प्रकारे प्रत्येक मानवाची जन्मल्याबरोबर सर्वात आधी ओळख होते ती स्तनांशी. स्तन जे स्त्रीयांच्या शरीराच्या आकर्षणाचा महत्त्वाचा केंद्रबिंदू असल्यामुळे स्त्रीचं व्यक्तीमत्व आकर्षक दिसतं. खरं तर प्रत्येक स्त्री आपआपल्या परिने आपण सुंदर व व्यवस्थित दिसावं या करिता जे प्रयत्न करता येईल तेवढे प्रयत्न करीत असते. पण या प्रयत्नामध्ये शरीराच्या बांध्याची आवश्यता हवी असते. तारुण्यात पाऊल टाकल्यापासून ते साधारण ५०-५५ वयापर्यंत स्त्री पत्नी, आई, सासू या भूमिकेतून जात असताना सुद्धा जशी घराची, मुलांची, पतीची, नातेवाईकांची, शेजाऱ्यांची काळजी घेत असते तशी आपल्या शरीराची, राहणीमानाची काळजी घेत असते. येत्या ८-१० वर्षात ब्युटी पार्लरमुळे तर तारुण्याचचं तारुण्य आणि म्हातारपणात तारुण्यमय दिसण्याचं कॉस्मेटिक साधनांमुळे व फॅशनेबल कपड्यांमुळे प्रत्येकजण सुंदर व भारदस्त व्यक्तीमत्व कसं दिसेल या प्रयत्नात असतो. त्यात वैद्यकीय क्षेत्रात प्लास्टिक सर्जरी ही उपचार पद्धतीने तर क्रांती केली. तुम्हाला हवा तसा शरीराचा आकार बदलून मिळतो. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9850822648, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com